किंमत - वार्षिक वर्गणी १००/- रुपये

# अर्थबोधपत्रिका

## मोजक्या वेळेत जगाबद्दलची जाण वाढविणारे उद्‌बोधक व माहितीपूर्ण मासिक


३● भरण-पोषण

५● दर्शन अपु-या पोषणाचे....

११● ....दिशा सामाजिक सुरक्षेची

१९● अर्थबोधपत्रिका पुरवणी

आर्थिक पुनर्रचनेला राजकीय प्रतिसाद

- आर्थिक पुनर्रचना आणि कल्याणकारी योजना
- राजकीय प्रतिसादाचे रूप-स्वरूप



**खंड १२ : अंक ७** **ऑक्टोबर २०१३**

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी**


**वार्षिक वर्गणी १००/- रुपये (परदेशस्थ वाचकांसाठी $ २०)** वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

**'अर्थबोधपत्रिका'** दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.


वर्गणीसाठी पत्ता : व्यवस्थापक,

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध,

९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग,

(रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.

फोन : २५६५७१३२, २५६५७२१०, २५६५७६९७

ई-मेलः- ispe@vsnl.net

website- www.ispepune.org.in



**अर्थबोधपत्रिका**

**खंड १२ (अंक ७) ऑक्टोबर २०१३**

**संपादक - अभय टिळक**

**साहाय्यक संपादक - राज्यश्री क्षीरसागर**


*'अर्थबोधपत्रिकेतील माहिती कशी?*

- उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- निःपक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक

### अर्थबोधपत्रिकेचा हेतू

**प्रतिष्ठित व अग्रगण्य नियत-कालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यतः इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी वेचक माहिती संदर्भासह पुरविणे.**

*अर्थबोधपत्रिका कशी साकारते?*

- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याला अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.


◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.

◆अंकातील लेख आपण नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.**यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# भरण-पोषण

'या नभाने या भुईला दान द्यावे....' या काव्यपंक्तीनुसार यंदा देशभरात पावसाने भरभरुन दान दिले आहे. आता अन्नधान्य पिकविण्याची जबाबदारी माणसांची आहे. अन्नधान्य नुसते पिकवून भागत नाही. त्याची साठवण व खरेदी-विक्री हे विषयही नीटपणे हाताळावे लागतात. समाजातील सर्व घटकांना योग्य दरांत अन्नधान्य उपलब्ध करून देणे ही लोकांनी निवडून दिलेल्या सरकारची जबाबदारी असते. विशेषतः, वंचितांच्या भुकेचा प्रश्न तरी किमान सोडविणे हे कल्याणकारी सरकारचे आद्य कर्तव्य ठरते. याच भूमिकेतून भारतीय संसदेने अन्नसुरक्षा विधेयक मंजूर केले आहे. या विधेयकामुळे काही प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे आणि त्यांचा विचार आपल्याला यथावकाश करावाच लागेल. आजघडीला तरी नागरिकांचे भरण-पोषण होणे महत्त्वाचे ठरते. अन्नसुरक्षेचा हा प्रश्न केवळ भारतातच आहे असे नाही. देशोदेशींच्या सरकारांना आपापल्या देशातील वंचितांना कोणत्या ना कोणत्या प्रकारची अन्नसुरक्षा पुरविणे भाग पडते आहे. विकसनशील देशांमधील सरकारांसमोर हे आव्हान ठरते. सर्वसमावेशक आर्थिक विकासाचा मार्ग धरून ठेवत वंचितांसाठी सामाजिक सुरक्षेचे छत्र निर्माण करायचे असे हे दुहेरी आव्हान असते. सामाजिक सुरक्षेच्या छत्रांतर्गत विविध योजना आखण्यासाठी वंचित घटकांचे प्रश्न समजून घ्यावे लागतात. 'अपु-या पोषणा'चा प्रश्न हा इथे महत्त्वाचा ठरतो. या विषयाची जगभरातील स्थिती कशी आहे, याचा ऊहापोह आंतरराष्ट्रीय पातळीवरील संस्थाही करत असतात. किंबहुना, अशा संस्थानी केलेले अभ्यास/सर्वेक्षण हे देशोदेशींच्या सरकारांना धोरणे आखण्याच्या दृष्टीने उपयुक्तच ठरत असते. अन्य देशांमधील स्थिती, त्या संबंधीच्या चर्चा, त्यांनी आखलेली धोरणे आणि त्या धोरणांचे लाभार्थींना झालेले फायदे अशा बाबी अशा अभ्यासांमधून पुढे येत असतात. इतरांच्या अनुभवांतून शिकण्यासारखे असे काही मुद्दे आढळले की त्यांच्या प्रकाशात आपल्या देशात आखण्यात आलेल्या योजना नीट न्याहाळून पाहता येतात. 'अन्न व कृषी संघटने'च्या (FAO) अभ्यासावरील दोन लेख या दृष्टीने अंकात मांडले आहेत.



जगभरात साधारणपणे १९९८०च्या दशकानंतर आर्थिक उदारीकरणाच्या पर्वास सुरुवात झाली. आपल्या देशातील आर्थिक पुनर्रचना पर्वास देशाच्या राजकीय व्यवस्थेने आजवर दिलेल्या प्रतिसादाची चौफेर चिकित्सा भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीने २ व ३ ऑगस्ट २०१३ या दोन दिवशी आयोजित केलेल्या प्रा. वि. म. दांडेकर स्मृतिचर्चासत्रादरम्यान अर्थशास्त्र तसेच राज्यशास्त्र या दोन विद्याशाखांतील अभ्यासक-संशोधकांनी केली. त्या चर्चा-चिकित्सेचा गोषवारा गेल्या महिन्याच्या अंकापासून 'अर्थबोधपत्रिके'च्या वाचकांसाठी सादर करण्यात येतो आहे. भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीचे मानद संचालक प्रा. विकास चित्रे यांनी चर्चासत्रादरम्यान केलेल्या सादरीकरणाच्या सारांशाचा दुसरा भाग आणि राज्यशास्त्राचे अभ्यासक प्रा. सुहास पळशीकर यांनी केलेल्या सादरीकरणाचा वेचक अंश पुढील पानांवर मांडलेला आहे. ■■

## वाचकांना विनंती

'अर्थबोधपत्रिके'चा अंक दर महिन्याच्या १०तारखेला पोस्टाद्वारे पाठविला जातो. २५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास प्रथम आपल्या पोस्टात चौकशी करावी व नंतरच आमच्याकडे लेखी तक्रार करावी. अंक शिल्लक असल्यास पुढील महिन्याच्या अंकाबरोबर पाठविला जाईल.

**माहितीसाठी - 'अर्थबोधपत्रिके'चे मागील अंक संस्थेच्या संकेत - स्थळावर उपलब्ध आहेत. त्यासाठी www.ispepune.org.in या संकेतस्थळाला वाचकांनी अवश्य भेट द्यावी.**

## निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा वेबसाइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

## सामाजिक - १

# दर्शन अपु-या पोषणाचे.....

'कशासाठी, पोटासाठी' असे म्हणत जगभरातील बहुसंख्य नागरिकांचे दैनंदिन व्यवहार चालू असले तरी अनेकानेक कारणांमुळे करोडो नागरिकांचा समावेश 'अपुरे पोषण असलेले गट' यात होत असल्याचे आढळते. 'अन्न व कृषी संघटने'ने (FAO) मांडलेल्या 'द स्टेट ऑफ फूड सिक्युरिटी इन द वर्ल्ड' (२०१२) या अहवालातील अभ्यासानुसार आजघडीला (२०१०-१२) या गटातील नागरिकांची संख्या सुमारे ८७ कोटी म्हणजे एकूण जागतिक लोकसंख्येच्या १२.५ टक्के इतकी आहे. 'दररोज प्रत्येक व्यक्तीला १८०० किलो कॅलरीज्पेक्षा कमी उष्मांक आहारातून मिळत असतील तर ते अपुरे पोषण ठरते,' अशी व्याख्या 'अन्न व कृषी संघटने'ने या अभ्यासासाठी वापरलेली आहे. वय व शारीरिक बांधा, दैनंदिन कामाचा प्रकार यांवर उष्मांकाची प्रत्येकाची गरज बदलू शकते ('अपुरे पोषण' व 'भूकग्रस्त' असे दोन शब्दप्रयोग समानार्थी मानून आलटून-पालटून या अभ्यासात वापरलेले आहेत). या अभ्यासावर आधारित 'दर्शन अपु-या पोषणाचे' आणि 'दिशा सामाजिक सुरक्षेची' असे दोन लेख इथे सादर केले आहेत.

'अपुरे पोषण' असणा-यांची संख्या १९९०-९२ या काळात सुमारे १०० कोटी इतकी होती. विसाव्या शतकाच्या अखेरीस, म्हणजे १९९०-२००१ या काळात ती सुमारे ९१ कोटी इतकी होती. २००४-०६ या काळात ती सुमारे ८९ कोटी इतकी झाली. म्हणजे, २००४-०६ या काळात 'अपुरे पोषण' असलेल्या गटातील नागरिकांची संख्या अल्प प्रमाणात घटली असे दिसते. विशेषतः, २००७ नंतर या संख्येत अत्यल्प घट झाल्याने ती जणू ८७ कोटींवर स्थिरावली आहे की काय, असे वाटावे असे आजघडीचे चित्र आहे. या गटात असलेल्या ८७ कोटी नागरिकांपैकी सुमारे ८५ कोटी नागरिक विकसनशील देशांमधील आहेत, ही एक काळजीची बाब आहे (तक्ता १ पाहावा).



**तक्ता १ - विकसनशील देशांमधील 'अपुरे पोषण'**

| | १९९०-९२ | | १९९९-२००१ | | २००४-०६ | | * २०१०-१२ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | कोटी | टक्के | कोटी | टक्के | कोटी | टक्के | कोटी | टक्के |
| **जग** | **१००** | **१८.६** | **९१.९** | **१५** | **८९.८** | **१३.८** | **८६.८** | **१२.५** |
| **विकसित देश** | **२** | **१.९** | **१.८** | **१.६** | **१.३** | **१.२** | **१.६** | **१.४** |
| **विकसनशील देश** | **९८** | **२३.२** | **९०.१** | **१८.३** | **८८.५** | **१६.८** | **८५.२** | **१४.९** |
| **आफ्रिका** | **१७.५** | **२७.३** | **२०.५** | **२५.३** | **२१** | **२३.१** | **२३.९** | **२२.९** |
| उत्तर आफ्रिका | ०.५ | ३.८ | ०.५ | ३.३ | ०.५ | ३.१ | ०.४ | २.७ |
| सब-सहारन--आफ्रिका | १७ | ३२.८ | २० | ३० | २०.५ | २७.२ | २३.४ | २६.५८ |
| **आशिया** | **७३.९** | **२३.७** | **६३.४** | **१७.७** | **६२** | **१६.३** | **५६.३** | **१३.९** |
| पश्चिम आशिया | ८ | ६.६ | १३ | ८.० | १६ | ८.८ | २१ | १०.१ |
| दक्षिण आशिया | ३२.७ | २६.८ | ३०.९ | २१.२ | ३२.३ | २०.४ | ३०.४ | १७.६ |
| मध्य आशिया | ०.९ | १२.८ | १.१ | १५.८ | ०.७ | ९.९ | ०.६ | ७.४ |
| पूर्व आशिया | २६.१ | २०.८ | १९.७ | १४.४ | १८.६ | १३.२ | १६.७ | ११.५ |
| आग्नेय आशिया | १३.४ | २९.६ | १०.४ | २० | ८.८ | १५.८ | ६.५ | १०.९ |
| **लॅटिन अमेरिका** | **६.५** | **१४.६** | **६** | **११.६** | **५.४** | **९.७** | **४.९** | **८.३** |
| **ओशियानिया** | **०.१** | **१३.६** | **०.१** | **१५.५** | **०.१** | **१३.७** | **०.१** | **१२.१** |

**टीप - (१) 'अपुरे पोषण' या गटातील नागरिकांची जागतिक लोकसंख्येशी असलेली टक्केवारी वरील तक्त्यात देण्यात आली आहे. (२)* या काळातील नागरिकांची संख्या व टक्केवारी ही अंदाजित आहे (संदर्भ - अन्न व कृषी संघटनेने केलेले सर्वेक्षण).**

'अपुरे पोषण' या गटातील नागरिकांची नेमकी संख्या मोजण्यासाठी या अभ्यासात काही नवीन पद्धतींचा अवलंब करण्यात आला होता. मात्र, भाववाढ आणि आर्थिक क्षेत्रातील मंदी या दोन बाबी इथे महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. त्यामुळे आकडेवारी मिळवताना अनेक बाबींचा सर्वंकष विचार होऊन माहिती मिळायला हवी, असे या अहवालाने नमूद केले आहे. अन्नसुरक्षा, पाच वर्षांखालील बालकांमधील मृत्यूचे प्रमाण, विकास इत्यादी, अभ्यासात रूढ असलेल्या बाबी लक्षात घेऊन 'अपु-या पोषणा'चा अभ्यास करण्यात आला होता. उपरोक्त तक्त्यावरून असे दिसून येते की 'अपुरे पोषण' भरून काढण्याचे प्रयत्न आशिया आणि लॅटिन अमेरिका येथे ब-याच प्रमाणावर झालेले आहेत.

पश्चिम आशियातील देशांमध्ये ‘अपुरे पोषण’ या गटातील नागरिकांचे प्रमाण वाढलेले दिसते. आग्नेय आशियातील आणि पूर्व आशियातील देशांनी या गटातील नागरिकांचे प्रमाण कमी करण्यात बरेच यश मिळवलेले दिसते. २००७-१० या काळात अन्नधान्याची भाववाढ आणि जागतिक स्तरावरील वित्तीय संकट या दोन महत्त्वाच्या घडामोडी घडल्या होत्या. त्यामुळे ‘अपुरे पोषण’ या गटातील नागरिकांचे प्रमाण वाढण्याची शक्यता वर्तवली जात होती. पण तसे घडले नसल्याचे आकडेवारीवरून दिसून येते. याची दोन कारणे संभवतात - (१) नेहमीच्या खाण्याच्या सवयी, पद्धती व अन्नधान्याची उपलब्धता यांवर आधारित ही बाब मोजण्यात आली होती. अन्नधान्याची उपलब्धता कमी-जास्त होणे ही तात्कालिक बाब असल्याने अपु-या पोषणावर तिचा दीर्घकाळ टिकणारा परिणाम होईल असे नाही. (२) वित्तीय संकटांचा धक्का विकसनशील देशांमध्ये अपेक्षेइतक्या मोठ्या प्रमाणावर बसलेला नाही, हे दुसरे कारण होय. त्या काळात विकसनशील देशांमधील वाढीच्या दरात घसरण झालेली दिसली तरी भारत, चीन, इंडोनेशिया या देशांमधील अन्नधान्याचे दर तेव्हा ब-यापैकी स्थिर होते. तरीदेखील भूकग्रस्तांचे प्रमाण कमी करण्याचे प्रयत्न जवळपास गोठल्याचे असे दिसते. या संदर्भात सर्वच देशांमध्ये एकसारखी स्थिती होती असे नाही. अशा घटनांना सामोरे जाण्याची प्रत्येक देशाची क्षमता व तद्नुषंगिक धोरणे या बाबी इथे महत्त्वाच्या ठरतात.


**आर्थिक विकास आणि आहारातील बदल**

१९९०च्या दशकानंतर झालेल्या आर्थिक विकासामुळे जगभरातील भूक व कुपोषणाचे प्रमाण कमी होण्यास काही प्रमाणात तरी हातभार लागला आहे. १९९० ते २०१० या काळात जागतिक पातळीवरील वास्तव दरडोई उत्पन्नात दरसाल सरासरी सुमारे २ टक्के वेगाने वाढ झालेली आढळते. अर्थात, देशपरत्वे यांत भिन्नता असू शकते. तरीदेखील, देशोदेशींच्या नागरिकांचा आर्थिक विकास होऊन प्रत्येकाला पोषक आहार मिळावा यासाठी तीन पाय-या महत्त्वाच्या ठरतात. आर्थिक विकासाच्या व रोजगाराच्या संधी वंचितांना मिळाव्यात आणि त्यांच्या उत्पन्नात वाढ व्हावी ही पहिली पायरी ठरते.




वाढीव उत्पन्नातील भाग वंचितांनी अन्नधान्यावर, सकस आहारावर व स्वच्छता आणि आरोग्यविषयक बाबींवर खर्च करणे ही दुसरी पायरी ठरते. तर, वंचितांसाठी सामाजिक सुरक्षेचे छत्र तयार करून प्रामुख्याने आरोग्य व शिक्षण यांवर देशोदेशींच्या सरकारांकडून खर्च केला जाणे ही तिसरी पायरी ठरते. वास्तव दरडोई उत्पन्नात वाढ झाल्यानंतर विविध खाद्यपदार्थ खाण्यात येऊन अन्नसेवनात वाढ झाली आणि साधारणपणे दर माणशी दर दिवशी २१० उष्मांक इतकी अधिक ऊर्जा देशोदेशींच्या नागरिकांना उपलब्ध होऊ लागली, असे अभ्यासातून दिसून आले आहे. तसेच आहारातील कोणकोणत्या खाद्यघटकांचे प्रमाण ढोबळमानाने वाढले ते पुढील तक्त्यांत (तक्ता २ व ३) दर्शविण्यात आले आहे.

**तक्ता २ - उत्पन्नात वाढ झाल्यानंतर खाद्यघटकांमध्ये झालेली वाढ**




(टीप - उत्पन्नाच्या पातळीनुसार केलेल्या कुटुंबांच्या उतरंडीमध्ये समाजातील सर्वांत वरच्या २५ टक्क्यांत समाविष्ट असणा-या (Q५) आणि तळाच्या २५ टक्क्यांत समाविष्ट असणा-या (Q१) कुटुंबांचा समावेश या पाहणीत नमुना तत्त्वावर करण्यात आला होता. जगभरातील एकंदर ४७ देशांमध्ये ही पाहणी करण्यात आली. संदर्भ - अन्न व कृषी संघटनेने केलेले सर्वेक्षण)

**तक्ता ३ - उत्पन्नात वाढ झाल्यानंतर मेद व अन्य घटकांमध्ये झालेली वाढ**





तक्ता क्रमांक २वरून असे दिसते की, आशिया, लॅटिन अमेरिका, उत्तर आफ्रिका आणि सब-सहारन आफ्रिका येथील सर्वांत वरच्या स्तरात समाविष्ट असणा-या (Q५) गटात, प्राणीजन्य खाद्यपदार्थांचे सेवन वाढलेले आहे. या गटामध्ये सब-सहारन आफ्रिकेचा अपवाद वगळता साखरेचा वापरही वाढलेला आढळतो. तर, तळाच्या स्तरात समाविष्ट असणा-या (Q१) गटात, तृणधान्यांचा वापर अधिक प्रमाणात होतो असे दिसते. तसेच, फळे व भाज्या खाण्याचे प्रमाण या गटात कमी आहे. फळे व भाज्या खाण्याचे प्रमाण समाजाच्या वरच्या स्तरातही भरपूर आहे, असे आढळत नाही. या दोन्ही गटांत डाळी खाण्याचे प्रमाणही कमीच असल्याचे दिसते.

Q५ व Q१ या दोन्ही गटांतील नागरिकांच्या आहारातील मेदघटकांचा वाढलेला वापर ही आरोग्याच्या दृष्टीने काळजीची बाब ठरू शकते, असे तक्ता क्रमांक ३ वरून दिसून येते. Q५ व Q१ या गटांत आहारातील प्रथिनांचे प्रमाण अल्प प्रमाणातच वाढलेले दिसते. विकसनशील देशांमधील Q१ गटाच्या तुलनेत अत्यल्प विकसित देशांमधील गटातील Q१ नागरिकांच्या आहारात तृणधान्यांचा वापर अधिक प्रमाणात होतो असे दिसते.



अनेक देशांमध्ये प्राणीजन्य घटकांचे आहारातील प्रमाण वाढलेले आढळते (तक्ता ४). त्यामुळे लोह, जस्त, अमायनो ॲसिड, जीवनसत्वे अ

**तक्ता ४ - देशोदशींच्या आहारातील प्राणीजन्य घटकांची वाढ**





व ब-१२ असे काही आरोग्यघटक शरीराला उपलब्ध होतात. असे असले तरी कोणत्या वयोगटातील व्यक्ती, कोणते पदार्थ व किती प्रमाणात खाण्यास प्राधान्य देते, याचा विचार इथे केला जाणे गरजेचे ठरते. कारण, सर्वच प्राणीजन्य पदार्थांमधून पोषक घटक मिळतीलच असे नाही. उदाहरणार्थ, मासे खाणे आरोग्यदायी आहे, असे म्हटले जाते. मात्र, मांस (रेड मीट) खाणे अपायकारक ठरू शकते. त्यामुळे मांसाहार बेताने केला जाणे गरजेचे ठरते. प्राणीजन्य पदार्थ खाण्याचे प्रमाण अमेरिकेत मात्र घटलेले दिसते, याची नोंद या अभ्यासाने केली आहे.

आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम बहुतेक देशांनी १९८०च्या दशकानंतर सुरू केला. १९९०नंतर त्याचे परिणाम दिसून येऊ लागले. त्या नंतरच्या काळात भारत, चीन आणि ब्राझील या देशांतील नागरिकांच्या आहारात प्राणीजन्य घटकांची मोठी वाढ झाल्याचे आढळते. तर, इटली, जर्मनी व फ्रान्स या युरोपीय देशांमधील नागरिकांच्या आहारात प्राणीजन्य घटकांची वाढ अल्प प्रमाणात झाल्याचे दिसते. **(पृष्ठ १८ वर पाहावे)**

# ....दिशा सामाजिक सुरक्षेची

जगभरातील वंचित घटकांना आर्थिक विकासात सहभागी करून घेण्याचे उद्दिष्ट आदर्श असले तरी ही वाटचाल सोपी नाही. कृषिक्षेत्राचा विकास घडवून आणणे आणि प्रामुख्याने ग्रामीण भागाशी नाळ जोडल्या गेलेल्या वंचित घटकांना त्याचा फायदा मिळवून देणे हे गुंतागुंतीचे ठरते. त्यातच जगभरात वेगाने घडून आलेल्या औद्योगिकीकरणामुळे व त्या पाठोपाठ झालेल्या शहरीकरणामुळे कृषिक्षेत्राच्या व ग्रामीण भागाच्या विकासाचे उद्दिष्ट गाठणे ही दीर्घकालीन नियोजनाची बाब ठरते. म्हणून आजपर्यंत झालेल्या एकूण आर्थिक विकासाचे फायदे वंचित घटकांनाही मिळावेत यासाठी प्रयत्न केले जातात. विशेषतः, अपु-या पोषणाची समस्या दूर करण्यासाठी काही योजना आखल्या जातात. त्वरित अंमलबजावणी करता येऊन फायदे घेता येतील अशा काही अल्पकालीन योजना व आर्थिक विकासाच्या दीर्घकालीन योजना या दोन्हींचा अवलंब एकाच वेळी करण्याला विविध देशांमधील सरकारे प्राधान्य देतात.

'सामाजिक सुरक्षेचे छत्र' या अंतर्गत सामाजिक सुरक्षेची विविध प्रकारची धोरणे व त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी असलेली साधने यांचा समावेश होतो. एक उदाहरण म्हणून कंबोडियातील राष्ट्रीय सामाजिक सुरक्षा धोरणाचा खालील आराखडा या दृष्टीने बोलका आहे.






देशोदेशींच्या सरकारांच्या योजना साधारणपणे अशाच प्रकारच्या असतात आणि त्यासंबंधीच्या चर्चेतील मुद्यांमध्येही समानता आढळते. त्यामुळे, या संदर्भातील जागतिक पातळीवरील अभ्यासातूनही असेच काहीसे मुद्दे मांडले जाताना दिसतात. भारतातील अनेक योजनांबाबत घडून आलेली चर्चाही इथे ताडून पाहता येईल. गरीब व वंचित घटकांसाठी आखण्यात आलेल्या बहुतांश योजनांमध्ये वंचित घटकांचा आर्थिक सहभाग अपेक्षित नसतो. विविधांगी धोरणे आखून वंचितांचा त्यांचा लाभ मिळावा यासाठी विशेष प्रयत्न केले जाता. शाळांमध्ये पोषक आहार पुरविणे, वंचितांना रोख रक्कम वा वस्तूरूपाने मदत देणे, आरोग्य व शिक्षणविषयक सोयी-सुविधा उपलब्ध करून देणे, सामूहिक आरोग्य विमा योजना कार्यान्वित करणे, शेतीक्षेत्रास विविध प्रकारची अनुदाने देणे या प्रकारे वंचितांना मदत केली जाते. अशा योजनांच्या लाभार्थींसाठी कधी काही अटीही घातल्या जातात. मुख्य म्हणजे, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि आरोग्यविषयक प्रगतीसाठी उपयुक्त ठरतील असे या अटींचे स्वरूप असते. आरोग्य केंद्रांवर जाऊन नियमित तपासणी करणे, शाळांमध्ये नियमितपणे उपस्थित राहणे अशा प्रकारच्या या अटी असतात. काही योजनांचे स्वरूप सर्वांसाठी अशा प्रकारचे वाटते, पण प्रत्यक्षात मात्र त्या अनुदानाचा लाभ वंचितांनाच मिळावा हे अपेक्षित असते. किंबहुना, त्यांच्यासाठीच त्या अनुदानाची सोय असते. वंचित घटकांमधील नागरिक दुधाचे छोटे डबे खरेदी करीत होते ही बाब लक्षात घेऊन टयुनिशियाच्या सरकारने दुधाचे छोटे डबे कमी किंमतीत उपलब्ध करून दिले होते.

योजना राबवताना काही देशांना आलेले अनुभवही विचारात घेण्यासारखे असतात. अपु-या पोषणाचा प्रश्न सोडविण्यासाठी ब्राझीलमध्ये Belo Horizonte या तेथील तिस-या क्रमांकाच्या मोठ्या शहरासाठी एक विशेष योजना आखण्यात आली होती. १९९०च्या दशकाच्या सुरुवातीस या शहराची लोकसंख्या सुमारे २५ लाख इतकी होती. तेथील ३८ टक्के नागरिक दारिद्र्यरेषेखाली होते आणि तीन वर्षांखालील सुमारे २० टक्के बालके कुपोषित होती. त्यामुळे, 'पुरेसे व सकस अन्न' हा 'मानवाधिकार' मानून तिथे अन्नसुरक्षा उपलब्ध करून देण्यात आली होती.

शहराच्या अंदाजपत्रकातील फक्त २ टक्के निधी यासाठी वापरण्यात आला होता. या योजनेमुळे तेथील बालमृत्यूंचे प्रमाण सुमारे ६० टक्क्यांनी घटले. त्या धोरणांतर्गत परस्परांना पूरक अशा २० पेक्षा अधिक उपयोजना आखण्यात आल्या होत्या. त्यातील काही अशा -

● संपूर्ण योजनेचे नियोजन व अंमलबजावणी यासाठी नगरपालिकेतर्फे एक विशेष मध्यवर्ती विभाग स्थापन करण्यात आला होता.

● शहर परिसरात काही मोकळ्या जागांवर काही भाज्या, फळे वा अन्य पिके घेता येईल का, याचा अभ्यास करून तसे प्रशिक्षण संबंधितांना देण्यात आले.

● जे दुकानदार किमान २५ आरोग्यदायी जिन्नस कमी किंमतीत उपलब्ध करून देतील त्यांना विविध जिनसांच्या विक्रीसाठी विशेष जागा उपलब्ध करून देण्यात आल्या.

● शहरानजीकच्या भागांतील छोट्या शेतक-यांना त्यांचा शेतमाल थेट ग्राहकांना म्हणजे वंचित घटकांना विकता यावा यासाठी जागा देण्यात आल्या (थेट शेतक-यांकडून माल मिळण्याची सोय झाल्याने तो माल वंचितांना परवडणा-या किंमतीत उपलब्ध होऊ शकला आणि शेतक-यांनाही योग्य भावात विक्री करता आली).

● आरोग्यतज्ज्ञ, आहारतज्ज्ञ, क्रीडातज्ज्ञ, शिक्षणतज्ज्ञ इत्यादींच्या मदतीने वंचितांसाठी मोफत कार्यशाळा आयोजित करून त्यांना पुरेसा व पोषक आहार यांबाबतची माहिती देण्यात आली. पोषक अन्न शिजवण्याच्या पाककृतीही त्यांना शिकवण्यात आल्या.

● शालेय पोषक आहार योजना राबवण्यात आली.

● सार्वजनिक उपाहारगृहांमध्ये वंचितांना परवडणा-या किंमतीत पोषक आहार उपलब्ध करून देण्यात आला. यासाठी नगरपालिकेने अनुदान दिले होते.

Belo Horizonte या शहरात राबविण्यात आलेल्या या योजनेपासून प्रेरणा घेऊन आफ्रिकेतील शहरांमध्येही अशा प्रकारच्या योजना कार्यान्वित करण्याचे ठरविण्यात आले. तर, या अनुभवानंतर ब्राझीलने Zero Hunger Policy असे धोरण आखले.



'सामाजिक सुरक्षेचे छत्र' या अंतर्गत काही अटींवर रोख रक्कम देण्याची वा अन्नधान्य देण्याची योजना अनेक देशांमध्ये राबविण्यात येते. अशा योजनांच्या अंमलबजावणीबाबतचे अभ्यासही करण्यात आले आहेत. लॅटिन अमेरिकेतील अभ्यासातून असे दिसून आले आहे की, रोख रक्कम दिल्यानंतर वंचित घटकांमधील कुटुंबांचा आहारावर होणारा खर्च काहीसा वाढलेला दिसला तरी ती तात्कालिक बाब ठरण्याची शक्यता अधिक असते. हा खर्च पोषक आहारावर झाला किंवा कसे हे समजणे अवघड ठरते. मेक्सिको आणि निकाराग्वा येथे वंचित घटकांमधील नागरिकांनी पोषक आहारावर खर्च केला असावा असे म्हणता येते. कारण, वंचित घटकांमधील बालकांची उंची वाढलेली आढळली असे नोंदण्यात आले आहे. ब्राझील आणि होंडुरास येथील तीन वर्षांखालील बालकांच्या आहारात सुधारणा होऊन त्यांना पोषक आहार मिळाला असे मात्र दिसून आले नाही. मेक्सिकोमधील बालकांच्या आहारात लोहाचे प्रमाण वाढलेले दिसले. मात्र, निकाराग्वा व होंडुरास येथे असे घडल्याचे आढळले नाही. कुटुंबातील महिलांच्या हाती रोख रक्कम देण्यात आली तर कुटुंबाचा आहार अधिक वैविध्यपूर्ण बनत असल्याचे आढळते, असे श्रीलंकेसारख्या देशातील अभ्यासातून आढळले. तर, बांगलादेशात असे दिसून आले की कणकेचे वाटप करण्यात आल्याने महिलांच्या आहारात सुधारणा झाली.

पोषक आहारासंदर्भात ग्वाटेमाला येथे एका छोट्या गटासाठी अभ्यास करण्यात आला होता. बालवयात पोषक आहार मिळाला तर त्याचा आर्थिक उत्पादकतेवर परिणाम होतो किंवा कसे हे या वेळी तपासण्यात आले होते. १९६९-७७ या काळात एका खेड्यातील सहा महिने ते तीन वर्षे या वयोगटातील २,३९२ बालकांना अभ्यासादरम्यान विशेष पोषक आहार (atole) देण्यात आला होता. तर, दुस-या खेड्यातील बालकांना तुलनेने कमी पोषक आहार (fresco) देण्यात आला होता. त्या नंतर २००२-०४ या काळात २५ ते ४२ या वयोगटातील १४२४ नागरिकांची माहिती या संदर्भात मिळविण्यात आली. अभ्यासादरम्यान विशेष आहार दिलेल्या एकूण २३९२ बालकांपैकी ६० टक्के बालकांचा (म्हणजे आता तरुण झालेल्या नागरिकांचा) या १४२४ नागरिकांमध्ये समावेश होता.

तेव्हा असे लक्षात आले की, ज्या बालकांना विशेष पोषक आहार (atole) देण्यात आला होता त्यांना मोठेपणी दर तासाला सुमारे ४६ टक्के अधिक मेहेनताना मिळवता येत होता. तुलनेने कमी पोषक आहार (fresco) दिलेल्या गटाच्या तुलनेत त्यांचे कामाचे तास कमी असूनही त्यांची मिळकत अधिक होती. परंतु, या गटांमधील फरक संख्याशास्त्रीयदृष्ट्या लक्षणीय नव्हता. पाहणीसाठी निवडण्यात आलेल्या नमुन्याचे लहान आकारमान हे त्यामागील संभाव्य कारण असावे.

**शेती व नवतंत्रज्ञान**

विकसनशील देशांमधील वंचित घटक उपजीविकेसाठी प्रामुख्याने शेतीवर अवलंबून असल्याने कृषीक्षेत्रातील सुधारणांचा विचार करणे इथे गरजेचे ठरते. या सुधारणांमुळे त्यांचे उत्पन्न कसे वाढेल आणि त्यांना पोषक आहार कसा मिळेल, हे पाहणे अगत्याचे ठरते. शेतीचे कामकाज निसर्गचक्रावर अवलंबून असल्याने पाउसपाणी व अन्य नैसर्गिक आपत्तींमुळे शेती करणे हे जोखमीचे काम ठरते. तसेच, यामुळे शेतकरी अडचणीत येऊ शकतात, ही बाब कृषीक्षेत्राबाबत विचार करताना लक्षात घ्यावी लागते. या संदर्भात भौगोलिक परिस्थिती महत्त्वाची ठरते. शिवाय, जागतिक तापमानवाढीमुळे घडून येत असलेले पर्यावरणीय बदल, अतिवृष्टी व पूर वा कधी दुष्काळ अशा घटनाही इथे फार महत्त्वाच्या ठरतात. जमीन, पिके घेण्याच्या पारंपरिक पद्धती व अन्य अनेक बाबी विचारात घेऊन शेतकरी शेतीतून उत्पन्न मिळवत असतात. पण तरीदेखील त्यांचे उत्पन्न तुटपुंजे ठरू शकते. त्यामुळे शेतीसंबंधित संभाव्य धोके टाळणे आणि धोक्यांना सामोरे जाण्यासाठी सुयोग्य नियोजन करणे गरजेचे ठरते. नियोजनामुळे धोक्यांची तीव्रता कमी करणे शक्य होते. जलसिंचनाच्या व पीक विमा योजना आखणे, जैवतंत्रज्ञानाचा वापर करून रोगप्रतिबंधक व दुष्काळी परिस्थितीत टिकाव धरणाऱ्या प्रजाती तयार करणे, दर हेक्टरी उत्पादन वाढण्यासाठी प्रयत्न करणे पण त्याचबरोबर रासायनिक खतांच्या वापरामुळे जमिनीचा कस नष्ट होणार नाही याची काळजी घेणे इत्यादी मार्गांचा अवलंब नियोजनात करणे शक्य असते. शेतजमिनींवर शेतकऱ्यांचा, शेतकरी महिलांचा हक्क असणेही उपयुक्त ठरते.



**हवे छत्र सामाजिक सुरक्षेचे**

गरिबीच्या दुष्टचक्रात शेतकऱ्यांनी व वंचित घटकांनी अडकू नये यासाठी त्यांच्या हिताच्या योजना 'सामाजिक सुरक्षेचे छत्र' या अंतर्गत आखल्या जायला हव्यात. 'सामाजिक सुरक्षेचे छत्र' महत्त्वाचे असले तरी अनेक विकसनशील देशांनी ते अद्याप स्वीकारलेले नाही किंवा जे स्वीकारले आहे ते अपुरे ठरताना दिसते, असे जागतिक बँकेने म्हटले आहे. विकसनशील देशांमधील सुमारे ६० टक्के नागरिक आणि जगातील गरीब देशांमधील सुमारे ८० टक्के नागरिक अजूनही या छत्राच्या बाहेर आहेत, असे जागतिक बँकेने म्हटले आहे. सामाजिक सुरक्षा व विशेषतः अन्नसुरक्षेच्या प्रश्नाचा विचार मानवाधिकाराच्या संदर्भात करण्यात येत असून किमान काही अन्नसुरक्षा सर्वांना मिळावी, असे आग्रही प्रतिपादन आताशा केले जाताना दिसते. 'सामाजिक सुरक्षेचे छत्र' देताना देशकालपरत्वे विविध योजना आखणे गरजेचे ठरते. कोणती योजना, कोणत्या देशात व कशा प्रकारे अधिक उपयुक्त ठरू शकेल त्याचा अभ्यास करून निर्णय घेणे उचित ठरते. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे असे विविध प्रयत्न लाभार्थींपर्यंत कमीत कमी वेळेत व योग्य पद्धतीने पोहचणे महत्त्वाचे आहे. त्या दृष्टीने नियोजन केले तर या छत्राचा उपयोग झाला असे म्हणता येईल.

अर्थात, सामाजिक सुरक्षेची दिशा स्वीकारली तरी अशा प्रयत्नांमधून आणखी काही वेगळेच प्रश्न निर्माण होऊ शकतात, हे वास्तव लक्षात घ्यावे लागते *(भारतात अन्नसुरक्षा विधेयकाबाबत अशा प्रकारची चर्चा झाली होती : अधिक माहितीसाठी पाहा - अर्थबोधपत्रिका सप्टेंबर व ऑक्टोबर २०१२ )*. तरीदेखील काही ना काही कृती करणेही सरकारांसाठी गरजेचे ठरते. देशोदेशींच्या सरकारांच्या विविध योजना व कृतींमुळे विकसनशील देशांमधील 'अपुरे पोषण' या गटातील नागरिकांची संख्या घटली आहे. तर, आर्थिक विकासात पिछाडीवर पडलेल्या देशांमध्ये ती वाढली आहे (पृष्ठ १७ वरील तक्ता पाहावा). एकंदरीत असे आढळते की, 'अपुरे पोषण' दूर करण्यासाठी सामाजिक सुरक्षा व सर्वसमावेशक विकास या दोन्ही मार्गांवर एकाच वेळी वाटचाल करावी लागते. त्या वाटचालीत काही कठोर निर्णय घेण्यालाही पर्याय नसतो, ही खूणगाठ बांधलेली बरी! ■■

### विकसनशील देशांमधील ‘अपुरे पोषण’ व त्यात झालेली प्रगती

| अर्थव्यवस्थांचे ↓ प्रकार | १९९०-९२ कोटी | १९९९-२००१ कोटी | २००४-०६ कोटी | २००७-०९ कोटी | २०१०-१२ कोटी | झालेला बदल *(टक्के) |
|---|---|---|---|---|---|---|
| विकसनशील देश | ९८.० | ९०.१ | ८८.५ | ८५.२ | ८५.२ | (-)१३.१ |
| **अत्यल्प** विकसित देश | २०.१ | २२.८ | २३.३ | २४.३ | २६.० | २९.५ |
| **अल्प उत्पन्न** गटातील देश | १९.२ | २२.३ | २२.६ | २३.४ | २४.५ | २७.१ |
| अल्प व मध्यम उत्पन्न गट | ४४.१ | ४१.४ | ४२.० | ४०.३ | ३९.५ | (-)१०.४ |
| **भारत** | **२४.०** | **२२.४** | **२३.८** | **२२.७** | **२१.७** | **(-)९.३** |

टीप - * १९९०-९२ ते २०१०-१२ या काळात झालेला बदल

**अहवालातील अभ्यासासाठी अन्न व कृषी संघटनेने केलेल्या व्याख्या**

***कुपोषण* (Malnutrition)** - *(१) अत्यंत अपु-या व निकृष्ट दर्जाच्या आहारामुळे पुरेसे उष्मांक न मिळाल्याने आरोग्याचा किमान दर्जा खालावणे (२) अनारोग्यकारक खाद्यपदार्थांचे अतिसेवन झाल्याने अतिउष्मांकांमुळे आरोग्याचा दर्जा खालावणे*

***अपुरे पोषण/भूकग्रस्तता* (Undernourishment or Chronic Hunger)** - *शरीराला आवश्यक असणा-या उष्मांकांचा सातत्याने अभाव असणे (दर दिवशी दर माणशी किमान १८००किलो कॅलरीज् इतके उष्मांक मिळणे आवश्यक).*

***अन्नसुरक्षा* (Food Security)** - *आरोग्यदायी जीवन जगण्यासाठी सर्व नागरिकांना सदासर्वकाळ किमान १८०० किलो कॅलरीज् इतके उष्मांक देणारा पोषक आहार त्यांचे नित्य वास्तव्य असणा-या परिसरात उपलब्ध होणे, परवडणा-या किंमतीत त्यांना तो विकत घेता येणे*

***अन्न अ-सुरक्षा* (Food Insecurity)** - *काही कारणांमुळे पोषक आहार उपलब्ध नसणे व त्यामुळे कृतिशील आरोग्यदायी जीवन जगण्याची हमी नसणे. (१) खाद्यघटक उपलब्ध नसणे (२) अन्नधान्य व खाद्यपदार्थांच्या न परवडणा-या किंमती (३) कुटुंबात उपलब्ध असणारा पोषक आहार कुटुंबातील सर्वांना न मिळणे ही त्यामागील कारणे.*



(पृष्ठ १० वरून)

‘अपु-या पोषणा’चे जागतिक पातळीवरील दर्शन अभ्यासांमधून अशा प्रकारे पुढे आलेले दिसते. दरडोई ठोकळ देशी उत्पादनांत वाढ झाली तर अपु-या पोषणाच्या स्थितीत काही प्रमाणात सुधारणा होऊ शकते, असेही या अभ्यासांतून आढळते. म्हणून सर्वसमावेशक आर्थिक विकासाचे (इन्क्लुझिव्ह ग्रोथ) महत्त्व अधोरेखित होते. समाजातील सर्व घटकांपर्यंत आर्थिक विकास पोहचावा यासाठी कृषिक्षेत्राचा विकास होणेही गरजेचे ठरते. कारण, विकसनशील देशांमधील वंचित घटक हे उपजीविकेसाठी प्रामुख्याने कृषिक्षेत्रावर अवलंबून असतात आणि अपु-या पोषणाची समस्या ही प्रामुख्याने वंचित घटकांशी संबंधित आहे. कृषिक्षेत्राचा विकास घडून आला तर त्यांचे उत्पन्न वाढते. वाढीव उत्पन्नाचा वापर त्यांनी पोषक आहार मिळविण्यासाठी करणेही अपेक्षित आहे. त्याचबरोबर स्वच्छता, आरोग्य आणि शिक्षण या बाबींवरही वाढीव खर्च करणे अपेक्षित आहे. या संदर्भात देशोदेशींच्या सरकारांनीही वंचित घटकांना स्वस्त दरात अन्नधान्य उपलब्ध करून देणे आवश्यक ठरते. सामाजिक सुरक्षा, अन्नसुरक्षा हे विषय इथे महत्त्वाचे ठरतात. ■■

**मौज प्रकाशन गृह आणि भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी यांच्या संयुक्त विद्यमाने नवे प्रकाशन**

**उदारमतवादाच्या संस्कृतीचे बीजारोपण करीत १९व्या शतकातील भारतीय प्रबोधनास आकार देणा-या रानडे-तेलंग-चंदावरकर या तीन लोकोत्तर व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा विश्लेषक आलेख**

**तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ**

**लेखक - नरेन्द्र चपळगावकर**

**पृष्ठे : ३१५ किंमत : ३००/- रुपये**

**समाजपुरुषांचा वारसा आणि वसा यांचे उचित भान आणून देणारा संशोधनपूर्ण वाचनीय दस्तऐवज**

# अर्थबोधपत्रिका पुरवणी

## आर्थिक पुनर्रचनेला राजकीय प्रतिसाद

### आर्थिक पुनर्रचना आणि कल्याणकारी योजना

आर्थिक पुनर्रचनेचा प्रवास १९९०च्या दशकाच्या मध्यावर पोहोचल्यावर मात्र आपल्या देशातील राजकीय व्यवस्थेकडून आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाला मिळणारा प्रतिसाद हळूहळू बदलू लागला. पुनर्रचनेच्या त्या टप्प्यावर त्या कार्यक्रमाचा जो तपशील ज्या पद्धतीने लोकांच्या समोर उलगडत होता त्यामुळेही त्याला मिळणा-या प्रतिसादाचे रंगरूप पालटत होते. बँकिंगच्या क्षेत्रातील बदलांच्या जोडीनेच शेअर बाजारातील सुधारणांना १९९०च्या दशकाच्या मध्यास चालना देण्यात आली. 'सेबी'ची स्थापना त्याच काळात झाली. म्युच्युअल फंडांना त्याच काळात वाव मिळाला. गुंतवणुकदारांना दीर्घकालीन गुंतवणुकीवर मिळणारा भांडवली लाभ करमुक्त करण्याची तरतूद त्याच्याच आगेमागे अस्तित्त्वात आली. खुल्या बाजारातून भांडवल उभारणी करण्याबाबत खासगी 'कॉर्पोरेट' क्षेत्राला याच काळात मोकळीक बहाल केली गेली. सुधारणांचा हा सगळा तपशील असा राहिल्यामुळे ''आर्थिक पुनर्रचना अथवा आर्थिक सुधारणा कार्यक्रम हा केवळ खासगी 'कॉर्पोरेट' क्षेत्राच्या पथ्यावरच पडणारा आहे'', अशी प्रतिमा म्हणा वा भावना, १९९०च्या दशकाच्या मध्यास व्यापक स्तरावर निर्माण झाली. आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाची दोन दशके उलटून गेल्यानंतर आज नेमकी तशीच भावना वा प्रतिमा अधिक बळावलेली दिसते. आता तर, खासगी औद्योगिक घराण्यांना बँका स्थापन करण्यास परवानगी देण्याबाबत अनुकूल धारणा धोरणात्मक पातळीवर दिसते आहे. खासगी उद्योगघराण्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या बँकांचे राष्ट्रीयीकरण आपल्या देशात १९६९ साली घडवून आणले गेले. आता, खासगी उद्योगांनीही बँका स्थापन करण्यास परवानगी देण्याचे घाटते आहे.



सकृद्दर्शनी या सा-या बदलांचे लाभ कॉर्पोरेट क्षेत्रालाच मिळणार होते. त्यांतील काही सर्वसामान्य मनुष्याच्या वाट्याला थेट येण्याची शक्यता नव्हती. दुसरीकडे, महागाई हळूहळू आपला जम बसवत होती. आपल्या देशात सुरक्षा कवचाची काहीच सुविधा उपलब्ध नव्हती आणि नाही. या सगळ्यामुळे, आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाच्या या टप्प्यावर विरोधाचा सूर उमटू लागला. त्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर ते स्वाभाविकही होते. त्याच वेळी १९९५च्या सार्वत्रिक निवडणुकांदरम्यान काँग्रेस पक्ष हरला.

देवेगौडा आणि इंद्रकुमार गुजराल यांच्या अल्पजीवी सरकारांनंतर १९९८ ते २००४ या काळात भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्त्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारने केंद्रात धुरा सांभाळली. आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाच्या तेथवरच्या वाटचालीदरम्यान निर्माण झालेले असमतोल दुरुस्त करण्यावर राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारने त्याच्या कारकिर्दीत भर दिला. मुख्य म्हणजे, पायाभूत सेवासुविधांचा पुरवठा वाढवण्यावर त्या काळात लक्ष पुरविण्यात आले. सुवर्ण चतुष्कोण महामार्ग योजना, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, सर्व शिक्षा अभियान यांसारख्या उपक्रमांची सुरुवात त्या काळात झाली. हे झाले तरी सामाजिक सुरक्षा आच्छादनांची वानवा सर्वसामान्यांना जाणवत होतीच. या सगळ्या बदलांचा आणि त्यातून निष्पन्न होणा-या वा झालेल्या प्रगतीचा वाटा देशातील ग्रामीण भागांकडे फारसा वळलाच नाही. वातावरणीय बदलांपायी १९९०च्या दशकाच्या अखेरीस आपल्या देशातील शेतीउत्पादनास दोन ते तीन वर्षे फटकाही बसला. याचा परिणाम असा झाला की, 'इंडिया शायनिंग' ची घोषणा भारतीय जनता पक्षाच्या पथ्यावर २००४ सालच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये काही पडली नाही. परिणामी, २००४ सालच्या निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या पदरी हार आली.

या पार्श्वभूमीवर, २००४ सालानंतर राबविल्या जात असलेल्या आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाचा कल सर्वसामान्यांना सामाजिक सुरक्षेचे कवच पुरवण्याकडे झुकलेला दिसतो. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, सार्वजनिक शिधावाटप योजनेचे सक्षमीकरण, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान... यांसारख्या योजनांद्वारे त्याचा प्रत्यय येतो.

**वित्तीय तुटीवर अंकुश**

सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे सक्षमीकरण घडवून आणत असताना या शिधावाटप योजनेचे लाभ निर्धारित लाभार्थी गटांनाच पुरविण्याचे धोरण सरकारने अंगीकारले. म्हणूनच तिचे नामाभिधान 'टार्गेटेड पब्लिक डिस्ट्रिब्यूशन सिस्टिम' असे करण्यात आले. समाजातील तुलनेने दुर्बळ घटकांना आधार पुरवत असतानाच अनुदानांचा सरकारी तिजोरीवरील बोजा वाढू नये याची तरतूद सरकारने हा पर्याय स्वीकारून केली. वित्तीय तूट हाताबाहेर जाऊ नये, यासाठी हे करणे अनिवार्यच होते. कारण, सरकारच्या वित्तीय तुटीवर नियंत्रण ठेवण्याच्या धोरणाचाही पाठपुरावा याच काळात सुरू झालेला होता. ग्रामीण भागातील इच्छुक कुटुंबांना वर्षातील शंभरच दिवस रोजगार पुरवण्याची जबाबदारी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत सरकारने घेण्यामागेही वित्तीय तुटीचे नियंत्रण करण्याच्या उद्दिष्टाचे भान सरकारला पुरेपूर असल्याच्या वास्तवाचा अनुभव येतो. समाजातील रोजगारगरजू घटकांना सामाजिक सुरक्षेचे कवच पुरवत असतानाच वित्तीय तुटीवर अंकुश ठेवण्याचे दुहेरी लक्ष सरकारने त्यात साधलेले दिसते.

पायाभूत सेवासुविधांच्या पुरवठ्यास एकीकडे चालना देत असतानाच दुसरीकडे उद्योगांनाही प्रोत्साहन देणारी पावले १९९८नंतरच्या काळात केंद्रातील सरकारने उचलली. औद्योगिक गुंतवणुकीस चालना देत औद्योगिक क्षेत्रातील रोजगार निर्मितीला वेग यावा, यांवर धोरणात्मक भर देण्यात आला. त्यांतही, खासगी गुंतवणूक उद्योगक्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर यावी, हा त्या धोरणांचा केंद्रबिंदू होता. विशेष आर्थिक क्षेत्रांच्या (स्पेशल इकॉनॉमिक झोन्स - सेझ) उभारणीस परवानगी देणा-या धोरणाचा केला गेलेला अंगीकार आणि पुरस्कार हा त्याच धोरणविचाराचा एक भाग होता. परंतु, 'सेझ'निर्मितीचे धोरण राबवून औद्योगिक गुंतवणूक व रोजगार यांना गती देण्याचा पर्याय पुरेशा विचारांती राबविला गेला होता, असे दिसत नाही. किंबहुना, 'सेझ'प्रणित विकासाच्या धोरणाचे संभाव्य विपरित परिणाम डोळ्याआड केले गेले, असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही. या धोरणाचा पुरस्कार अधिक विचारविनिमयांती करणे हितावह ठरले असते.



देशाच्या औद्योगिक क्षेत्रात सर्वांगीण स्थित्यंतर घडवून आणण्याची ताकद असणा-या 'सेझ'विषयक कायद्याला संसदेने अवघ्या दोन दिवसांत अनुमती बहाल केली. 'सेझ' स्थापन केलेल्या भूभागावरच कामकाज उभारणा-या उद्योगांना तेवढ्या नाना प्रकारच्या करसवलती देऊ केल्याने देशांतर्गत औद्योगिक विश्वात एक प्रकारचे द्वैत सरकारी धोरणाच्या माध्यमातूनच पोसले जाते, याचे उचित असे भान राखले गेले नाही. 'सेझ'मध्ये कारखाने उभारणा-या उद्योगांनाच केवळ कामगारविषयक कायद्यांमधून सूट मिळण्याने 'सेझ'बाहेर अन्यत्र उत्पादन करत असलेल्या कारखान्यांना 'सेझ'मध्ये स्थलांतर करण्यास प्रोत्साहन मिळेल, या वास्तवाकडे सरकारचा जणू काणाडोळा झाला अथवा सरकारने जाणूनबुजून काणाडोळा केला. 'सेझ'प्रणित विकासाचे धोरण राबविल्याने नवीन कारखान्यांची उभारणी घडून येऊन औद्योगिक गुंतवणूक व रोजगार यांत नव्याने भर पडण्याऐवजी, देशाच्या औद्योगिक नकाशावर उद्योग व औद्योगिक क्षमतांचे निव्वळ पुनर्स्थानांकन घडून आणण्यास प्रोत्साहन मिळेल, ही शक्यता ध्यानातच घेतली गेली नाही. 'सेझ'साठी भूसंपादन करण्यासंदर्भातील कायदेविषयक अडचणी व्यवहारात होत्या त्या वेगळ्याच.

या व यांसारख्या अन्य कारणांपायी औद्योगिक विकासाच्या 'सेझ'प्रणित 'मॉडेल'बाबत विविध व्यासपीठांवरून प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाऊ लागले. खासगी भांडवल आणि उपक्रमशीलतेमधून 'सेझ' निर्माण करण्यात आलेल्या केवळ एखाद्या छोट्या भूभागावरच कारभार थाटणा-या उद्योगव्यवसायांना करविषयक तसेच कामगारविषयक सवलती बहाल करण्यापेक्षा देशभरात सर्वत्रच करदरांची सरासरी पातळी घटवून उद्योगक्षेत्राला चालना देण्याचा पर्याय का अवलंबला जाऊ नये, असा पर्याय विचारला गेला. देशी उद्योगांची देशी तसेच विदेशी बाजारपेठांतील स्पर्धाक्षमता उंचावण्याच्या दृष्टीने देशभरातच करदरांचे सुसूत्रीकरण घडवून आणण्यावर सरकारने भर द्यावयास हवा होता, असेही प्रतिपादन 'सेझ'विषयक चर्चांदरम्यान केले गेले. या सगळ्याचा परिणाम एवढाच झाला की, 'सेझ'प्रणित औद्योगिक विकासाच्या 'मॉडेल'ने आपल्या देशात निदान आजवर तरी उचल घेतलेली दिसत नाही.

**राजकीय प्रतिसादातील मतभिन्नता**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे सक्षमीकरण यांसारख्या कल्याणकारी आणि समाजातील अभावग्रस्त समूहांना सामाजिक सुरक्षेचे काही एक किमान संरक्षक कवच पुरविणा-या योजनांची अंमलबजावणी करण्याचा लाभ काँग्रेस पक्षाच्या नेतृत्त्वाखालील संयुक्त पुरोगामी आघाडीला २००९ सालच्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये मिळाला. संयुक्त पुरोगामी आघाडी पुन्हा सत्तेवर आली.

अलीकडील चार वर्षांत, म्हणजेच, २००९ सालानंतर आर्थिक पुनर्रचना उपक्रमाच्या गाभा तपशीलात पुन्हा परिवर्तन घडून येत असल्याचे अथवा घडून आल्याचे आपल्या ध्यानात येते. वित्तीय संतुलन साधणे, त्यासाठी करावयाच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून इंधनांवरील अनुदानांत कपात घडवून आणणे, विविध क्षेत्रांतील परकीय गुंतवणुकीवरील कमाल मर्यादांचे शिथिलीकरण करणे या दिशेने आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाचा मोहोरा वळत असल्याचे ध्यानात येते. भाारतीय अर्थव्यवस्थेतील 'मल्टिब्रँड' किरकोळ व्यापाराच्या क्षेत्रातील परकीय थेट गुंतवणुकीची कमाल मर्यादा ५१ टक्क्यांपर्यंत वाढविण्याच्या सरकारच्या निर्णयाला अजून तरी फारसा प्रतिसाद मिळालेला नाही. परकीय थेट भांडवली गुंतवणुकीस प्रोत्साहन देण्याच्या प्रयत्नांचाच एक भाग म्हणून आणखी क्षेत्रांतील शिथिलीकरण सरकारच्या कार्यक्रमपत्रिकेवर आहे.

आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाच्या या टप्प्यावर त्या कार्यक्रमाला लाभणा-या राजकीय प्रतिसादामध्ये मतभिन्नतेचा अनुभव येऊ लागला. किरकोळ व्यापाराच्या क्षेत्रात परकीय थेट गुंतवणुकीस वाढीव वाव देण्याच्या प्रस्तावाला राजकीय पक्षप्रणालीकडून एकमुखी समर्थन मिळाल्याचे काही दिसले नाही. किरकोळ व्यापाराचे क्षेत्र देशभरात सर्वत्र विस्तारलेले आहे. परकीय भांडवलाचा प्रवेश या क्षेत्रामध्ये घडून आल्याने वाढणा-या स्पर्धेचा मुकाबला या क्षेत्रातील लहानमोठ्या अशा सर्वच व्यावसायिकांना वाढीव प्रमाणावर करावा लागणार आहे. देशातील किरकोळ व्यापारव्यावसायिकांच्या या विशाल क्षेत्राशी राजकीय पक्षांचे संबंध अनेक पातळ्यांवर निरनिराळ्या प्रकारे जुळलेले आहेत.



साहजिकच, किरकोळ व्यापाराच्या क्षेत्रात परकीय थेट भांडवलास मुभा देण्याच्या प्रस्तावाचा विविध राजकीय पक्षांच्या हितसंबंधांवर निरनिराळ्या प्रकारे परिणाम संभवणे स्वाभाविक ठरते. त्यामुळे, या प्रस्तावास विविध राजकीय पक्षांनी वेगवेगळ्या प्रकारे प्रतिसाद दिल्याचे आपण पाहिले. तीच बाब परकीय थेट गुंतवणुकीस विमा क्षेत्रात प्रवेश देण्याच्या प्रस्तावाबाबत अनुभवायला मिळाली. परकीय थेट भांडवलाला विमा क्षेत्रात प्रवेश देण्याच्या सरकारच्या धोरणास भारतीय आयुर्विमा महामंडळासारख्या विमा कंपन्यांतील कर्मचा-यांच्या संघटनांचा विरोध आहे. आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाची सघनता वाढल्यामुळे या कार्यक्रमाच्या आगेकूचीला समाजाकडून मिळणा-या प्रतिसादाची एकसंधता एकंदरीने खंडित होत असल्याचे चित्र अलीकडील काळात प्रकर्षाने उभरून पुढ्यात येते.

परकीय थेट भांडवली गुंतवणूक, संसदेच्या स्थायी समितीपुढे विचारार्थ प्रलंबित असलेले जमीन अधिग्रहण विधेयक, उद्योग क्षेत्राकडून ज्यांच्या संदर्भात वारंवार मागणी केली जाते असे कामगार कायद्यांतील काही बदल यांसारख्या व्यापक प्रमाणावर फेररचना घडवून आणण्याची क्षमता असणा-या धोरणात्मक बाबींचे देशी अर्थकारणातील वेगवेगळ्या क्षेत्रांवर तसेच आपल्या समाजातील विविध समूहांवर संभवणारे परिणामही तितकेच निरनिराळे आणि गुंतागुंतीचे आहेत. साहजिकच, अशा फेररचनांना आपल्या देशातील राजकीय पक्षप्रणालीकडून मिळणारा प्रतिसादही तितकाच व्यामिश्र आणि विरोधाचा स्वर प्रभावी असणारा ठरावा, यांत अनपेक्षित असेही काही नाही.

हीच बाब सध्या विचाराधीन असलेल्या अन्नसुरक्षा विधेयकाची. अन्नसुरक्षा विधेयकाचे रूपांतर उद्या कायद्यामध्ये घडून आल्यानंतर अन्नधान्यावरील अनुदानांच्या सरकारी तिजोरीवर आज पडत असलेल्या बोज्यात किती वाढ होईल, हा सरकारच्या लेखी अतिशय संवेदनशील मुद्दा आहे. या कायद्याचा लाभ अपेक्षित लाभार्थीपर्यंत व्यवहारात प्रत्यक्षात पोहोचावा यासाठी स्वस्त धान्य वाटप दुकानांद्वारे अन्नधान्य वितरणाच्या आपल्या देशातील विद्यमान पुरवठा व वितरण यंत्रणेचे जे सर्वांगीण सक्षमीकरण घडवून आणावे लागेल, ते तर निराळेच.

अन्नधान्य सुरक्षा विधेयकाचे रूपांतर अन्नधान्य सुरक्षा कायद्यामध्ये यथावकाश घडून आल्यानंतर अन्नधान्य जिनसांचे संकलन, साठवणूक, हाताळणी, 'पॅकेजिंग', वाहतूक, वितरण आणि वाटप करणा-या यंत्रणा अतिशय सक्षम आणि काटेकोर बनवाव्या लागतील. ही सगळीच आव्हाने अतिशय जटिल अशी आहेत. आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाचे हे पुढील टप्पे जसे आणि जेव्हा कार्यान्वित होतील त्या वेळी भारतीय अर्थव्यवस्थेचे व्यवस्थापन कमालीच्या कार्यक्षमपणे करण्याचे कोणत्याही सरकारच्या पुढ्यातील आव्हान अधिकच कडवे बनलेले असेल.

बरोबर २२ वर्षांपूर्वी आपल्या देशात सुरू झालेल्या आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाचा इथवरचा प्रवास आजवर अशा प्रकारे झालेला आहे. आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाचे कठोर स्वरूप मवाळ बनून आता या उपक्रमाचा प्रवास कल्याणकारी योजनांच्या दिशेने होऊ लागलेला आहे का, असा एक प्रश्न आताशा विचारला जातो. अर्थव्यवस्थेचे चलनवलन कार्यक्षम पद्धतीने घडून यावे या दृष्टीने अनिवार्य ठरणारे संरचनात्मक (स्ट्रक्चरल) बदल आणि या अशा संरचनात्मक बदलांचे अपेक्षित लाभ मुखात पडण्यापासून वंचित झालेल्या समाजघटकांसाठी पुरवावयाचे संरक्षक कवच निर्माण करणा-या कल्याणकारी योजना यांचे एक संतुलन निर्माण होऊन नांदणे अपेक्षित असते. संरक्षक कवच पुरविणा-या कल्याणकारी योजना आणि लोकानुनयी उपक्रम अथवा कार्यक्रम यांच्यातील सीमारेषा ही नेहेमीच अत्यंत अस्पष्ट असते. कल्याणकारी योजनांचा पेहराव पांघरून निखळ लोकानुनयी कार्यक्रम राबविण्याचा राजकीय पक्षप्रणालीला होणारा मोहही तितकाच बलवत्तर असतो. कल्याणकारी उपक्रम आणि लोकानुनयी योजना यांच्यातील अस्फुट असणारी सीमारेषा ओलांडण्याच्या बलवत्तर मोहावर विजय मिळवणे नेहेमीच कठिण जाते. आपल्या देशात राबवण्यात येत असलेल्या आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाला या पुढील काळात या सगळ्या पेचातूनच मार्गक्रमण करणे भाग आहे. ■■

**(भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष आणि ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. विकास चित्रे यांनी केलेल्या सादरीकरणाचा हा दुसरा भाग. पहिला भाग गेल्या महिन्याच्या अंकात वाचकांसाठी सादर केला होता).**



# आर्थिक पुनर्रचनेला राजकीय प्रतिसाद

## राजकीय प्रतिसादाचे रूप-स्वरूप

साधारणपणे दोन दशकांपूर्वी भारतीय अर्थव्यवस्थेत सुरू झालेल्या आर्थिक पुनर्रचना पर्वाला आपल्या देशातील राजकीय व्यवस्थेने आजवर नेमका कसा प्रतिसाद दिलेला आहे, या मुद्याबाबत राज्यशास्त्राच्या प्रांगणात सूत्रबद्ध, पद्धतशीर अशी चर्चा खरे पाहता आजवर झालेलीच नाही, हे वास्तव सुरुवातीसच नोंदवून ठेवायला हवे. मुळामध्ये स्वातंत्र्यानंतरच्या जवळपास ४०-४५ वर्षांत आपल्या देशात घडून आलेल्या आर्थिक प्रगतीला समाजवाद, नियोजनबद्ध विकासाची विचारप्रणाली यांची चौकट व पार्श्वभूमी लाभलेली होती. अशा देशात, निखळ बाजारपेठीय अर्थप्रणालीला अवकाश प्राप्त करून न देणा-या अर्थनीतीचा स्वीकार इतक्या सहजासहजी कसा काय केला गेला, या मुद्याभोवतीच राज्यशास्त्राच्या विद्याशाखेतील चर्चा मुख्यतः फिरत राहिली. या सा-या चर्चेचा गाभा हा विचारप्रणालीने भारित होता तर, तिचा सूर हा मूल्यात्मक दृष्टिकोणाने भिजलेला होता. 'उदारीकरण' (लिबरलायझेशन), 'खासगीकरण' (प्रायव्हटायझेशन) आणि 'जागतिकीकरण' (ग्लोबलायझेशन) आणि या तीन संज्ञा आणि त्यांच्या संयुक्त लघुरूपातून तयार होणारी 'एलपीजी' ही संज्ञा यांना या संपूर्ण चर्चाविश्वात फारशी प्रतिष्ठा नव्हती. या संकल्पनांना पाठिंबा म्हणजे लोकशाही राज्यव्यवस्थेमध्ये शासनसंस्थेकडून ज्या प्रकारची अपेक्षा सर्वसाधारणपणे धरली जाते त्या अपेक्षांना सपशेल सोडचिठ्ठीच, असे जणू या चर्चावर्तुळात गणले जात असे.

आर्थिक विकाससंदर्भातील हे मूल्यविचारात्मक स्थित्यंतर आपल्या देशात घडून कसे आले आणि फारशी खळखळ न करता ते स्वीकारले का व कसे गेले, यांबाबत राजकीय अभ्यासकांना आजवर समाधानकारक स्पष्टीकरण देता आलेले नाही. केवळ इतकेच नाही तर, या स्थित्यंतराची परिणती कशामध्ये घडून येईल याबाबतही राज्यशास्त्राच्या अभ्यासकांना आजवरच्या दोन दशकांत व्यवस्थित खुलासा अथवा विवेचनही करता आलेले नाही.

**राज्यशास्त्रातील चर्चेचा भर 'आयडिऑलॉजी'वर**

मात्र, या विषयाला अनुलक्षून राज्यशास्त्राच्या क्षेत्रांत आजवर काहीना काही लेखन होत आलेले आहे, हेही तितकेच खरे. परंतु, 'राज्यशास्त्र' नावाच्या विद्याशाखेकडून आर्थिक पुनर्रचनेच्या संदर्भात काही एक सूत्रबद्ध भूमिका मांडता आलेली नाही, हे वास्तवही मान्य करायलाच हवे. आर्थिक पुनर्रचनेचा हा संपूर्ण प्रश्न राज्यशास्त्राच्या अभ्यासक व संशोधकांनी आर्थिक प्रश्नापेक्षाही 'आयडिऑलॉजी'चा प्रश्न म्हणूनच बघितला, हे या मागील एक संभाव्य कारण असावे. आर्थिक पुनर्रचना कार्यक्रम, त्याची अर्थशास्त्रीय सैद्धांतिक चौकट, या फेररचनेचे संभाव्य परिणाम, या कार्यक्रमाद्वारे भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये उद्‌भवणारे अपेक्षित आणि अनपेक्षित बदल... यांसारख्या पैलूंबाबत अर्थशास्त्राच्या विचारकक्षेत आजवरच्या २२ वर्षांत विपुल चर्चामंथन घडलेले दिसते. राज्यशास्त्राने मात्र या सगळ्या प्रांताकडे केवळ विचारसरणीचा प्रश्न याच लोलकातून पाहिले. आपल्या देशातील या आर्थिक स्थित्यंतरासंदर्भात १९९०च्या दशकाच्या सुरुवातीस राज्यशास्त्राच्या वर्तुळात वापरली गेलेली परिभाषा वसाहतवादी आक्रमणाच्या विचारविश्वातील आणि त्याच्याशी संबंधित भाषाकोशातील होती. ''आर्थिक परिवर्तनाच्या या वळणावर आपल्या सगळ्यांनाच आता कंबर कसायला हवी'', या आशयाचे जे निवेदन तत्कालीन पंतप्रधान नरसिंहराव यांनी एकदा केले होते त्याची राज्यशास्त्राच्या वर्तुळातून बव्हंशी खिल्लीच उडवली गेली.

आर्थिक पुनर्रचना पर्वाला सुरुवात झाली ती १९९१ साली. १९९०च्या दशकाच्या मध्याला - म्हणजे, साधारणपणे १९९५-९६च्या दरम्यान राजकीय पक्षांच्या आघाडीवर अस्वस्थता होती. एक प्रकारची दबलेली बेचैनी त्या काळात विविध पक्षोपक्षांत सर्वत्र दिसत असे. त्या अस्वस्थतेमधून आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमावर दबक्या आवाजात केली जाणारी टीकाही ऐकू येत असे. इथे 'दबलेल्या आवाजातील' हे विशेषण मुद्दामच लावलेले आहे. त्याचे कारण असे की, अशी टीका करणा-यांपैकी काहींचा समावेश त्या आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाच्या जन्मदात्यांमध्ये, त्या कार्यक्रमाच्या प्रवर्तकांमध्ये होत होता.



देशातील एक वरिष्ठ समाजवादी नेते चंद्रशेखर, संयुक्त आघाडी, काँग्रेसमधील काही घटक या सगळ्यांचाच या ना त्या स्वरूपात आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमामध्ये सहभाग राहिलेला होता. त्यामुळे अशा घटकांकडून केली जाणारी टीका दबक्या आवाजात केली जाणे तसे स्वाभाविकही होते.

आपल्या देशातील राजकीय व्यवस्थेचे चित्र १९९०च्या दशकाच्या मध्यावर कसे होते ? देशातील राजकीय वास्तवाची व्यामिश्रता आणि जटिलता त्या काळात वाढीला लागलेली दिसत होती. त्याला कारण होते. ते असे की, त्या काळाच्या आगेमागे आपल्या देशातील राजकीय व्यवस्था क्रमाक्रमाने विलक्षण स्पर्धात्मक बनत चाललेली होती. एकपक्षीय व्यवस्थेचा वरचष्मा असलेल्या राजकीय व्यवस्थेमध्ये आर्थिक पुनर्रचना कार्यक्रम हाती घेतला गेला असता तर त्या उपक्रमाला मिळणारा अथवा मिळालेला राजकीय प्रतिसाद कदाचित वेगळाच ठरला असता. १९९१ साली सुरू झालेल्या आर्थिक पुनर्रचना पर्वाला त्या दशकाच्या मध्यावर प्रतिसाद देणारी आपल्या देशातील राजकीय व्यवस्था बहुपक्षीय स्पर्धाप्रधान बनत चाललेली होती, ही बाब इथे अधोरेखित करून ठेवणे भाग आहे.

आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाचा स्वीकार आपल्या देशात केला गेला त्याच वेळी पक्षीय स्पर्धा तीव्र बनत असलेल्या राजकीय व्यवस्थेचे युगही आपल्या देशात समांतरपणे अवतरत होते. मुख्य म्हणजे त्या काळात काँग्रेस पक्षाच्या वर्चस्वाला ओहोटी लागलेली होती. देशाच्या राजकीय क्षितिजावर नाना प्रकारच्या व विविधांगी विचारसरणीच्या राजकीय पक्षांचा उदय होत असल्याने पक्षीय स्पर्धा आणि तिच्यातून निपजणारे स्पर्धेचे राजकारण यांची सद्दी त्या काळात सुरू होऊ पाहत होती अथवा सुरू झालेली होती. त्यामुळे, स्वतःचा असा एक मतदारसंघ समाजात निर्माण करण्याचा स्पर्धात्मक दबाव देशातील पक्षोपक्षांवर त्या काळात विलक्षण वेगाने वाढत चाललेला होता. साहजिकच, असा मतदारसंघ आपल्या पाठीशी उभा करण्याच्याबाबतीत पक्षापक्षांदरम्यानची स्पर्धाही उत्तरोत्तर तीव्र बनत होती. नेमक्या त्याच काळात आपल्या देशातील आर्थिक धोरणेही बदलत असल्याने त्या बदलांना प्रतिसाद देण्याचे, त्या प्रतिसादाला आकार देण्याचे आव्हान राजकीय पक्षांच्या पुढ्यात होते.

## सावध प्रतिसाद

आपापला जनाधार गमावण्याची कोणत्याच राजकीय पक्षाची त्या वळणावर तयारी नव्हती. राजकीय व्यवस्थेतील स्पर्धा तर दिवसेंदिवस अधिकाधिक तीव्रच बनत चाललेली होती. आर्थिक सुधारणांबाबत काही एक ठोस अशी धोरणात्मक भूमिका घेऊन, नव्याने तयार होऊ पाहणारा जनाधार गमावण्यास आपल्या देशाच्या राजकीय व्यवस्थेतील एकही पक्ष त्या विलक्षण स्पर्धात्मक वातावरणात अनुकूल नव्हता. आपल्या हाताने आपल्या पायावर धोंडा पाडून घेण्याचा अव्यवहारीपणा कोण करील ? साहजिकच, आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाला राजकीय व्यवस्थेतील पक्षांचा त्या वेळचा प्रतिसाद हा सावध होता. आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाचे समर्थक असोत वा विरोधक, सुधारणांना त्यांच्याकडून त्या काळात मिळत राहिलेला प्रतिसाद हा सावधच होता. आर्थिक फेररचनेसंदर्भातील भूमिका, त्याबाबतचे वक्तव्य आणि आपापल्या भूमिकेभोवती घडवून आणावयाचे जनमताचे संघटन अशा तीनही पातळ्यांवर तो प्रतिसाद स्वरूपतः सावधच होता. याला एकमात्र अपवाद म्हणायचा तो म्हणजे डाव्या पक्षांचा. त्यामुळे, आर्थिक सुधारणांना राजकीय व्यवस्थेकडून म्हणा वा पक्षांकडून म्हणा, दिल्या जाणा-या वा तेव्हा दिल्या गेलेल्या प्रतिसादामध्ये राजकीय पक्षांदरम्यानच्या मतभिन्नतेचे प्रतिबिंबही डोकवलेले दिसते. आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाचे प्रवर्तन करून देशाला आर्थिक खाईतून वाचविल्याचे श्रेय कॉंग्रेस पक्ष घेत होता. तर, आर्थिक सुधारणांच्या नावाखाली देश विकायला काढल्याची टीका विरोधी सूर लावणारे राजकीय पक्ष करत होते. तिसरीकडे, नेहरूप्रणित समाजवादप्रधान आर्थिक विकासाच्या ''मॉडेल''मध्ये बदलत्या कालानुरूप अनिवार्य ठरलेले बदल आर्थिक सुधारणांच्या रूपाने प्रवर्तित केल्याचा प्रतिवाद करीत उपरोक्त दोन टोकांमध्ये विचाराच्या पातळीवर संतुलन साधण्याचा प्रयत्न करणारेही काही राजकीय पक्ष होते. एका परीने बघितले तर, चंद्रशेखर यांच्या नेतृत्त्वाखाली केंद्रात सत्तेवर आलेल्या अल्पजीवी सरकारला तत्कालीन परिस्थितीच्या रेट्याखाली अपरिहार्यपणे जे आर्थिक फेरबदल करणे भाग पडले तीच बदलांची दिशा १९९१ साली कॉंग्रेस पक्षाने तशीच पकडून वाटचाल पुढे चालू ठेवली.



मग आता प्रश्न उभा राहतो तो असा की, १९९१ साली कॉंग्रेस पक्षाचे चित्र नेमके कसे होते ? त्या वळणावर कॉंग्रेस पक्ष हा नेतृत्त्वहीन होता. करिष्मा लाभलेल्या नेतृत्त्वाला पक्ष त्या वेळी पारखा झालेला होता. विचारसरणीचाही पक्षापाशी तेव्हा अभावच होता. केवळ इतकेच नाही तर, कोणतीही स्पष्ट अशी व्यूहरचनाही पक्षाजवळ तेव्हा नव्हती. मध्य प्रदेशातील पंचमढी येथे त्या काळात झालेले पक्षाचे शिबिर या वास्तवाचा पुरावा ठरते. पक्षाचे पुनरुज्जीवन घडवून आणत ''एकला चालो रे''चा नारा त्या शिबिरातील चर्चामंथनाअंती पक्षाने दिला. म्हणजेच, आघाडीच्या राजकारणाला कॉंग्रेस पक्ष त्या टप्प्यावर अनुकूल नव्हता. १९९०च्या दशकाच्या प्रारंभीचे पक्षाचे चित्र हे असे होते. देशाच्या राजकीय व्यवस्थेमध्ये प्रदीर्घ काळ अतिशय महत्त्वाची भूमिका बजावलेला कॉंग्रेससारखा एक बलिष्ठ राजकीय पक्ष नेतृत्त्व, विचारसरणी आणि ठोस व्यूहरचना या तीनही बाबींपासून त्या वेळी वंचित होता. अशा पक्षाने आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाचे सुकाणू १९९१ साली पेलले होते, ही बाब विसरून चालणार नाही.

देशाच्या राजकीय व्यवस्थेतील एक प्रमुख विरोधी पक्ष म्हणून तोवर उदयाला आलेल्या भारतीय जनता पक्षाचे त्या वेळचे चित्र कसे होते, हेही नीट समजावून घेतले पाहिजे. राजकीय व्यवस्थेत कॉंग्रेस पक्षाने रिकामे केलेले मैदान भरून काढण्यासाठी भारतीय जनता पक्ष त्या वेळी प्रयत्नशील होता. बाबरी मशिदीच्या विध्वंसाचे जे लांछन त्या पक्षाला चिकटलेले होते त्यांतून बाहेर येण्याचीही पक्षाची पराकाष्ठा सुरू होती. ''हिंदुत्त्ववादी पक्ष'' म्हणून जो शिक्का त्याच्यावर मारला गेलेला होता त्यांबाबतही भारतीय जनता पक्ष त्या वेळी सचिंत बनू लागलेला होता. ''अतिरेकी, जहाल हिंदुत्त्वाचा नव्हे तर, समन्वयवादी हिंदुत्त्वाचा पुकार करणारा पक्ष'', अशी स्वतःची प्रतिमा निर्माण करण्याच्या प्रयत्नांत भारतीय जनता पक्ष त्या वेळी होता. अन्य मागासवर्गीय जनसमूहांमध्ये पाया विस्तारण्याचा कार्यक्रम पक्षाने तेव्हा जाणीवपूर्वक हाती घेतलेला होता. आपल्याशी आघाडी करण्यास राजी असणा-या विविध राजकीय पक्षांशी आघाडी करण्यासाठी भारतीय जनता पक्ष तेव्हा उत्सुक होता आणि त्या दिशेने पक्षाची त्या वेळी धडपडही सुरू होती.

**जनाधारांचे विघटन**

देशाच्या राजकीय व्यवस्थेतील काँग्रेस आणि भारतीय जनता पक्ष हे दोन प्रमुख राजकीय पक्ष अशा पद्धतीने पक्षांतर्गत फेरबदल, समस्यांची सोडवणूक, फेरजुळणी यांसारख्या आघाड्यांवर त्या वेळी असे गढलेले होते. त्यामुळे, देशात १९९१ साली सुरू झालेल्या आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाला पक्षीय पातळीवरून दिला जाणारा प्रतिसाद या दोन पक्षांच्या बाबतीतही बहुशः मुग्ध वा अनुच्चारित अशाच प्रकारचा होता. त्याच्याच जोडीने, त्या काळात विविध राजकीय पक्षांच्या सामाजिक जनाधाराचे विघटन होण्याची प्रक्रियाही सुरू झालेली होती. १९९०च्या मध्याला ही प्रक्रिया जशी दृश्यमान झाली त्याचप्रमाणे गेल्या दशकाच्या मध्यालादेखील अशाच प्रकारचे प्रवाह पुन्हा एकवार पृष्ठभागावर आले. त्यामुळे, कोणत्याही एखाद्या मुद्याबाबत ठाम भूमिका घेण्याऐवजी लवचीकता अंगी बाणवण्याचा खाक्या जवळपास सर्वच राजकीय पक्षांनी त्या काळात अवलंबलेला होता. आपल्याला पाठिंबा देणारे समाजसमूह आपल्या पाठीशी प्रदीर्घ काळ राहतील अथवा नाही, यांबाबत विविध राजकीय पक्ष तेव्हा साशंकच होते. राजकीय पक्षांना मिळणा-या जनाधारात त्या दरम्यान सतत चढ-उतार होत राहिले. त्या काळात झालेल्या निवडणुकांमध्ये मतपेटीद्वारा व्यक्त झालेल्या कौलाचे अभ्यासकांनी केलेले विश्लेषण, नानाविध क्षेत्रीय पाहण्यांचे ढोबळ निष्कर्ष हेच सूचित करतात.

देशाच्या काही भागांतील अन्य मागासवर्गीय जनसमूह १९९०च्या दशकात एका टप्प्यावर भारतीय जनता पक्षाला एकगठ्ठा मतदान करताना दिसले. त्यांतून भारतीय जनता पक्षाला काही ठिकाणी विजयही प्राप्त झाला. परंतु, १९९९च्या आगेमागे ही प्रक्रिया खंडित झाल्याचे ध्यानात येते. अन्य मागासवर्गीय जातसमूहांच्या राजकीय पक्षांचा उदय त्या सुमारास देशाच्या राजकीय क्षितिजावर घडून आला, हे त्याचे कारण. अन्य मागासवर्गीय जातसमूहांचा पाठिंबा आपल्याला भविष्यातही कायम राहील, याची हमी भारतीय जनता पक्षाला त्यामुळे राहिली नाही. त्याच वेळी उच्च व मध्यम जातसमूहांच्या पाठिंब्याची शाश्वतीही भारतीय जनता पक्षाला वाटेनाशी झालेली होती.



दुसरीकडे दलित आणि मुस्लिम मतांचेही विघटन होण्याची प्रक्रिया आकार घेत होती. साहजिकच, या दोन जात आणि/अथवा धर्मसमूहांचा पाठिंबा काँग्रेसलाही गृहीत धरता येईनासा झाला. त्यामुळे, वर्ग-जात-वर्ण-धर्म यांवर आधारित पाठिंब्यांची पक्षोपक्षांची समीकरणे या काळात बदलू लागली. त्यांची जडणघडण नव्याने सुरू झाली. तो सगळाच कालखंड असा परिवर्तनशील, जुन्या व्याख्या तपासून बघण्याचा, नवीन व्याख्या निर्माण होण्याचा ठरला. या सगळ्या घुसळणीचा एक मोठा परिणाम असा झाला की, कोणताच समाजसमूह हा आपला हक्काचा पाठिराखा आहे अथवा राहील, असे राजकीय व्यवस्थेतील कोणत्याच पक्षास गृहीत धरता येईना. त्यामुळे, समाजातील एखाद्याच वर्गाच्या आर्थिक कल्याणासाठी धोरणे आखण्याची व राबविण्याची जोखीम राजकीय पक्ष घेईनासे झाले. अथवा, तशी जोखीम पत्करण्यासारखी परिस्थिती तेव्हा उरली नाही, असे म्हणता येईल. त्यामुळे, समाजव्यवस्थेतील एखाद्या विशिष्ट समाजघटकाला आकर्षित करणारी धोरणे अंगिकारण्याऐवजी विविध समाजसमूहांना आपलीशी वाटणारी धोरणे अवलंबण्याकडे काँग्रेस तसेच भारतीय जनता पक्षाचा भर वळलेला आपल्याला दिसतो अथवा दिसत राहिला.

हे सगळे असे घडत असतानाच आपल्या देशात आणखी एक परिवर्तन घडून येत होते. देशातील मध्यम वर्गाचे स्वत्त्व आणि वर्चस्व यांचा उदय राजकीय व्यवस्थेच्या क्षितिजावर घडून येण्याची सुरुवात समांतरपणे झालेली होती. मुळात, ''मध्यम वर्ग'' अशी संज्ञा सरसहा वापरली जात असली तरी हा वर्गही एकसंध नाही याचे भान आपण ठेवलेच पाहिजे. या वर्गात असलेले विविध स्तर आणि उपस्तर, त्या स्तरोपस्तरांच्या राजकीय आशाआकांक्षा, त्यांत घडून येत असलेले बदल, त्या बदलांनुसार साकारणारे त्या त्या स्तराचे वा गटोपगटांचे राजकारण... यांसारख्या अनेकानेक बाबींचे अभ्यासपूर्ण रेखाटण व आलेखचित्रण आपल्या देशात आजवर केले गेलेले नाही, हे वास्तव या ठिकाणी मुद्दाम नोंदवून ठेवावयास हवे. मध्यम वर्गाच्या उदयाबाबत चौफेर चर्चा जरी होत असली तरी या संदर्भातील अनेक पैलूंबाबत समाधानकारक व पुरेसे अभ्यास हाती घेतले गेलेले नाहीत, ही वस्तुस्थिती मान्य करण्याशिवाय गत्यंतरच नाही.

**मध्यम वर्गाचा वाढता प्रभाव**

मध्यम वर्गाच्या उदयाचा देशातील राजकीय व्यवस्थेवर मात्र एक अतिशय सखोल परिणाम घडून आला. तो असा की, आजपर्यंत केवळ गोरगरिब आणि उपेक्षित, वंचित समाजघटकांच्या हिताची भाषा बोलणा-या राजकीय पक्षांना मध्यम वर्गाच्या आशाअपेक्षांची, संवेदनांचीही दखल घेणे आताशा भाग पडू लागलेले आहे. या वास्तवाचा पुरावा आपल्याला मतदानाच्या आकडेवारीद्वाराही मिळतो. २००४ सालातील निवडणूक निव्वळ गोरगरिबांनी केलेल्या मतदानाच्या बळावर काँग्रेस पक्षाने जिंकलेली नाही. २००४ साली झालेल्या निवडणुकांदरम्यान काँग्रेस पक्षाच्या नेतृत्त्वाखालील संयुक्त पुरोगामी आघाडीला मिळालेला विजय हा आर्थिकदृष्ट्या निम्न स्तरांतील वरचा उपस्तर आणि मध्यम वर्गातील निम्न उपस्तर यांच्या काँग्रेस पक्षाने अत्यंत चलाखपणे जुळवून आणलेल्या मोटेचा विजय होता, असे त्या निवडणुकीतील मतदानाचे विश्लेषण केले तर स्पष्ट होते. आर्थिकदृष्ट्या दुर्बळ घटकांमधील तुलनेने वरचा उपस्तर आणि सांपत्तिकदृष्ट्या मध्यम वर्गात मोडणा-या समाजस्तरातील खालचा उपस्तर यांच्या संयुक्त पाठिंब्यावर काँग्रेसला २००४ साली निवडणूक जिंकता आली. अर्थात, ''आर्थिकदृष्ट्या दुर्बळ गटांतील वरचा स्तर'' आणि ''मध्यम उत्पन्न गटातील खालचा स्तर'' या व्याख्या अतिशय ढोबळपणे केलेल्या आहेत, हे विसरून चालणार नाही.

मध्यम वर्गाच्या अशा वाढत्या प्रभावामुळे, आपल्या देशातील आर्थिक विकासाची धोरणे, त्या धोरणांना राजकीय व्यवस्थेकडून मिळणारा प्रतिसाद, त्या प्रतिसादाला आकार देणारे गटोपगटांचे राजकारण या सगळ्याच बाबींना अनुलक्षून घडून येणारी सार्वजनिक चर्चा गरिबी आणि गरिबीचे निराकरण यां मुद्यांपेक्षाही मध्यम वर्गाच्या जाणिवा-संवेदनांनी अधिक प्रभावित झालेल्या दिसल्या. आजही त्या तशाच दिसतात. साहजिकच, राजकारणाच्या या समग्र चर्चेवर मध्यम वर्गाचा वरचष्मा आता वाढत्या प्रमाणात अनुभवास येतो. आपल्या देशातील गरिबी, त्या गरिबीचे उच्चाटण हा १९७०च्या दशकातील राजकारणाचा, राजकीय वादचर्चेच्या केंद्रस्थानचा मुद्दा होता. आज तो तसा राहिलेला नाही. आज सर्वत्र चर्चा चाललेली दिसते ती मध्यम वर्गाच्या आशा-अपेक्षांची.



किंबहुना, आपल्या देशातील प्रचलीत राजकारण तसेच राजकीय प्रक्रियाकडेही अलीकडे मध्यम वर्गाच्या चष्म्यातूनच बघितले जाते. केवळ इतकेच नाही तर, आर्थिक सुधारणा वा आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमासंदर्भातील चर्चाही मध्यम वर्गाच्या अनुषंगानेच केली जाते. 'सरकार' नावाच्या संस्थेचे 'डाउन-साइझिंग' करण्यासंदर्भातील चर्चेचे उदाहरण या ठिकाणी वानगीदाखल देता येईल. सरकारचा व्याप कमी करण्यासंदर्भातील चर्चेची दोन अंगे त्या वेळी विचाराधीन होती. सरकारी कर्मचा-यांच्या संख्येत कपात घडवून आणणे हा एक पर्याय चर्चिला जात होता. तर, सरकारी खर्चात बचत करण्याच्या दृष्टीने अनुदानांना कात्री लावण्याचा दुसरा प्रस्ताव चर्चेत होता. त्यापैकी पहिल्या पर्यायाबाबत आपल्या देशातील मध्यम वर्गाची मनःस्थिती द्विधा होती. सरकारी नोकरांच्या संख्येत कपात घडवून आणण्यास मध्यम वर्गाचा, खरे म्हणजे, मनापासून पाठिंबा कधी नव्हताच. स्वच्छ सांगायचे तर मध्यम वर्गाचा त्याला विरोधच होता. सरकारी कर्मचा-यांसाठी स्वेच्छानिवृत्ती योजना लागू करण्याच्या प्रस्तावाला हा वर्ग अनुकूल नसल्याने सरकारचे 'डाउन-साइझिंग' करण्याच्या विचाराला मध्यम वर्गाचा प्रतिसाद सुरुवातीपासूनच सावध राहिला. परंतु, सरकारी खर्चामध्ये कपात करण्यासाठी अनुदानांना कात्री लावण्याच्या पर्यायाला मात्र मध्यम वर्गाचा भरघोस पाठिंबा पहिल्यापासूनच होता.

अनुदानांचे लाभ केवळ गरजूंनाच आणि तेही निवडक तत्त्वांवरच दिले जावेत, इतर समाजघटकांना ते मिळता कामा नये असा धोरणात्मक पवित्रा घेतला तरी अशा विविध प्रस्तावांना मध्यम वर्गाचा विरोध राहण्याचीच शक्यता अधिक वाटते. स्वयंपाकाच्या गॅसवरील अनुदान हे या संदर्भात चटदिशी देता येण्यासारखे उदाहरण ठरते. गॅसवर दिल्या जाणा-या अनुदानाबाबत जो विवाद अलीकडील काळात चालू आहे, त्याचा उलगडा आपल्याला याच मानसिकतेच्या चौकटीमधून करून घेणे भाग आहे. कारण, या प्रकारच्या अनुदानांची व्यवस्था प्रत्यक्ष व्यवहारात राबविणारी नोकरशाही अखेर याच मध्यम वर्गाचा घटक आहे. त्यामुळे, अगदी 'टार्गेटेड' अनुदानांच्या प्रस्तावांनाही 'खो' घालण्याचे प्रयत्न नोकरशाहीकडून वारंवार केले जातील याचीच शक्यता अधिक वाटते.

दोन दशकांपूर्वीची, म्हणजेच, १९९०च्या दशकातील ही सारी गुंतागुंत आणि तिच्यात अंतर्भूत असणारी उदंड व्यामिश्रता व्यवस्थितपणे समजावून घ्यायलाच हवी. आपल्या देशातील राजकारणविषयक सारी चर्चा ज्या मध्यम वर्गाच्या वरचष्म्याखाली अलीकडील काळात सुरू आहे त्या मध्यम वर्गाचे रू प-स्वरू पही आताशा बदललेले आहे. आजही ते बदलते आहे. एके काळी देशातील मध्यम वर्गामध्ये आपल्या समाजव्यवस्थेतील उच्चस्तरीय उच्च जातींचा आणि मध्यम जातसमूहांचा अंतर्भाव होत असे. अलीकडील काळात हे चित्र वेगाने बदलते आहे. पूर्वीच्या काळी मध्यम वर्गाचे संदर्भ मुख्यतः सामाजिक व सांस्कृतिक असत. आता ते बव्हंशी आर्थिक बनत चाललेले दिसतात. सध्याच्या मध्यम वर्गामध्ये उच्चस्तरीय उच्च व मध्यम जातसमूहांच्या जोडीनेच अन्य मागासवर्गीय तसेच काही तथाकथित दलित समाजसमूहांचाही अंतर्भाव झालेला दिसतो. त्याचा एक परिणाम असा झालेला दिसतो की, आपल्या देशात १९९१ सालापासून घडून येत असलेल्या आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमातून साकारणा-या बदलांना सामोरे जाण्यासंदर्भात आपल्या व्यवस्थेत काही प्रतिमाने साकार होत असल्याचे अनुभवास येते. ही प्रतिमानेही गेल्या दोन दशकांदरम्यान आपल्या देशात आकारत असलेल्या एका नवीन स्तरीकरणाचे प्रतिनिधित्व करतात, असे म्हटले तर ते वावगे ठरूनये. या प्रतिमानांचा नीट अभ्यास केला गेला जाणे अगत्याचे ठरते ते त्यापायीच. ■■

---

*भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीचे संस्थापक प्रा. वि. म. दांडेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दरवर्षी एका चर्चासत्राचे आयोजन करण्यात येते. यंदाच्या २ व ३ ऑगस्ट २०१३ या दोन दिवशी वार्षिक चर्चासत्र संपन्न झाले. **"आर्थिक पुनर्रचनेला राजकीय प्रतिसाद"** हा यंदाच्या चर्चासत्रासाठीचा बीजविषय होता. १९९१ सालापासून आपल्या देशात साकारत असलेल्या आर्थिक पुनर्रचनेला देशातील राजकीय व्यवस्थेने आजवर दिलेल्या प्रतिसादाचा विस्तृत आलेख प्रा. सुहास पळशीकर यांनी चर्चासत्रादरम्यानच्या त्यांच्या सादरीकरणात चितारला. त्याचाच निवडक अंश या लेखात मांडलेला आहे.* **■संपादक**



## वाचकांच्या माहितीसाठी

## सत्याग्रही विचाशरधारा

रंजनपर ललित साहित्याच्या जोडीनेच प्रबोधनाचे कार्य अंगिकारलेले **सत्याग्रही विचारधारा** हे मासिक गेली २२ वर्षे प्रसिद्ध होते आहे. भवताली घडणा-या घटनांमागील कार्यकारणभाव, साकारणा-या घटनाक्रमात दडलेले नानाविध 'पॅटर्न्स' उलगडून दाखवत समकालीन वास्तवाबाबत वाचकांचे आकलन समृद्ध बनवण्याचा प्रयत्न करणा-या या मासिकाचे संपादक आहेत 'युवक क्रांती दला'ची स्थापना करणारे डॉ. कुमार सप्तर्षी. तर, ज्येष्ठ मराठी समीक्षक व लेखक डॉ. अंजली सोमण या त्याच्या सहसंपादक आहेत. ललित आणि विश्लेषक असा दोन्ही प्रकारचा मजकूर सादर करणे हे 'सत्याग्रही विचारधारा'चे वैशिष्ट्य होय. **(वार्षिक वर्गणी २८०/ - रु पये)**

**पत्ता - क्रांतिनिकेतन, १४६८, सदाशिवपेठ, स. प. महाविद्यालयासमोर, पुणे ४११ ०३० (दूरध्वनी - ०२०-२४४६१४०९/२४४७५८६६)**

**ई-मेल** - satyagrahivichar@gmail.com

---

## वनराई

डॉ. मोहन धारिया यांनी प्रवर्तित केलेल्या 'वनराई' संस्थेच्या वतीने शेती, ग्रामीण विकास, वनीकरण, पर्यावरण व जलसंवर्धन इत्यादी विषयांना केंद्रस्थानी ठेवून **वनराई** हे मासिक गेल्या २२ वर्षांपासून प्रसिद्ध केले जाते आहे. गेली तीन वर्षे या मासिकाला 'आइस अवार्ड' तसेच ISSN2250-1215 हा क्रमांक मिळाला आहे. या मासिकाचे कार्यकारी संपादक अमित वाडेकर हे आहेत. वनराईचा यंदाचा दिवाळी विशेषांक **'समृद्ध भारत'** या विषयावर असून ज्येष्ठ संगणक शास्त्रज्ज्ञ डॉ. विजय भटकर या अंकाचे अतिथी संपादक आहेत. **(वार्षिक वर्गणी ३००/ - रु पये)**

**पत्ता - वनराई, आदित्य रेसिडेन्सी, मित्रमंडळ चौक,**
**४९८, पर्वती, पुणे, ४११ ००९**

**मोबाइल - ७५०७२४७७७७ ई-मेल** - vanaraitrust@gmail.com

### प्रमुख संदर्भ

**(A)** Books/Reports - The State of Food Insecurity in the World (2012), Food and Agriculture Organization (FAO) of the United Nations, Rome, 2012.

**(B)** भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीने आयोजित केलेल्या वि. म. दांडेकर स्मृती चर्चासत्रादरम्यान संस्थेचे मानद संचालक डॉ. विकास चित्रे आणि संस्थेच्या विश्वस्त मंडळाचे एक सदस्य व राज्यशास्त्राचे ज्येष्ठ संशोधक-अभ्यासक प्रा. सुहास पळशीकर यांनी चर्चासत्रात केलेल्या सादरीकरणाच्या आधारे संबंधित लेखांमधील मजकूर सिद्ध केलेला आहे. ■■

**Poverty in India**

**लेखक वि.म. दांडेकर, नीळकंठ रथ**

(पृष्ठे १४०, किंमत : २०० रुपये)

**अर्थकारण-समाजकारणाचे जिज्ञासू, साक्षेपी संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थी अशा सर्वांना उपयुक्त असा मौलिक ग्रंथ**

**दुसरी आवृत्ती प्रकाशित**

***आपल्या दैनंदिन जीवनावर प्रभाव पाडणा-या क्रांतिकारी मेंदूसंशोधनावरील आकर्षक, सचित्र व संग्राह्य ग्रंथ***

**कर्ता-करविता**

**आधुनिक मेंदूसंशोधन व आपले जीवन**

**लेखक - रमेश पानसे, राज्यश्री क्षीरसागर, अनिता देशमुख-बेल्हेकर**

**मराठी भाषेला अभिमान वाटावा असे पुस्तक - डॉ. ह. वि. सरदेसाई**

●मेंदूसंशोधन ही एक क्रांतीच! मानवी जीवनाला अधिक उच्च टप्प्यावर नेणारी ऐतिहासिक घटना! या क्रांतीचा आलेख रेखाटणारा ग्रंथ.

**पृष्ठे २४२** **किंमत ३५०/-रु पये**



## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

### 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

### 'अर्थबोधपत्रिका' वर्गणीदारांसाठी विशेष योजना

**वार्षिक वर्गणी फक्त १०० / - रुपये**

**द्वैवार्षिक वर्गणी फक्त १८०/ - रुपये**

**त्रैवार्षिक वर्गणी फक्त २६०/ - रुपये व एक पुस्तिका भेट**

**पंचवार्षिक वर्गणी फक्त ४०० /- रुपये व दोन पुस्तिका भेट**

**पुस्तिका -** (१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न : लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत ३०/-रुपये)

(२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण : (इंग्रजी व मराठी) लेखक - जयकुमार अनगोळ (दोन्हीची किंमत ३०/-रुपये प्रत्येकी)

(३) शोध घेते ते शिक्षण : लेखक - प्रा. रमेश पानसे (किंमत -५०/-रुपये)

# ग्रंथालयातील नवी पुस्तके

**Political Economy of Poverty Eradication in India and Essays on Fiscal Reforms, Raja J. Chelliah, Sage Publications India Private Limited, New Delhi, 2010. pp. xxxiii+143, Price - Rs. 495/-.**

आपल्या देशात मोजक्याच संख्येने असणा-या कर्त्या अर्थतज्ज्ञांमध्ये डॉ. राजा चेलैय्या यांची गणना होते. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीमधील कारकीर्द आटोपून १९७७च्या सुमारास भारतामध्ये परत आल्यानंतर उपयोजित संशोधन आणि अध्यापन अशा दोन्ही क्षेत्रांत डॉ. चेलैय्या यांनी आयुष्याच्या अखेरीपर्यंत घवघवीत कामगिरी बजावली. नवी दिल्ली येथे कार्यरत असणारी 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक फायनान्स ॲन्ड पॉलिसी' तसेच चेन्नई येथील 'मद्रास स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स' या दोन संस्था म्हणजे डॉ. चेलैय्या यांच्या कर्त्या अर्थवेत्तेपणाची संजीवन स्मारके होत. सरकारचे वित्तव्यवहार (पब्लिक फायनान्स) हा डॉ. चेलैय्या यांच्या निरंतर चिंतनाचा आणि संशोधनाचा विषय राहिला. आपल्या देशातील करप्रणालीमध्ये मूलभूत स्वरूपाच्या सुधारणा सुचविण्यासाठी १९९१ साली राष्ट्रीय स्तरावर स्थापन करण्यात आलेल्या करसुधारणा समितीचे अध्यक्ष या नात्याने प्रत्यक्ष तसेच अप्रत्यक्ष करांच्या व्यवस्थेमध्ये डॉ. चेलैय्या यांनी मूलगामी बदल सुचविले. करव्यवस्था आणि करप्रणाली, सार्वजनिक खर्च, सरकारची कर्जउभारणी, केंद्र तसेच राज्य सरकारांचे वित्तीय संबंध यांसारख्या विषयांइतकाच आपल्या देशातील चिवट गरिबीचे निराकरण हा डॉ. चेलैय्या यांच्या जिव्हाळ्याचा विषय होता. गरिबीच्या समस्येला आर्थिक आणि भौतिक कारणांइतकीच -हस्व दृष्टीने, केवळ तात्कालीक राजकीय लाभांवर नजर ठेवून स्वीकारली-राबविली जाणारी धोरणेही कारणीभूत आहेत, अशी डॉ. चेलैय्या यांची अभ्यासाधिष्ठित धारणा होती. यावर करावयाच्या उपाययोजनेची चर्चा करणारे त्यांचे प्रस्तुत पुस्तक अर्थशास्त्राइतकेच राज्यशास्त्राच्या अभ्यासक-संशोधकांनाही महत्त्वाचे वाटेल. ■■



**RNI Regn.No. MAHMAR/2002/9806**
**Postal Regn.No.: PNCW/M-125/2013-2015**
**Posted at Model Colony Post Office Pune, on 10th of each month**

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग -व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/ पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक ('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते.

■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात.

■अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणा-या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

**- संस्थेचे नियंत्रण मंडळ -**

●विकास चित्रे ●सुरिंदर जोधका ●रमानाथ झा ●अभय टिळक
●रवींद्र ढोलकिया ●ललित देशपांडे ●आनंद नाडकर्णी ●दिलीप नाचणे
●सुहास पळशीकर ●मनोहर भिडे ●योगेंद्र यादव ●नीळकंठ रथ
●ए.वैद्यनाथन ●एस. श्रीरामन

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक व्ही. एस. चित्रे यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**